(सभापतीस्थानी माननीय सभापती)

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती . प्रश्नोत्तराच्या तासा नंतर सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करावा.

श्री.कपिल पाटील :माझा औचित्याचा महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती : ठीक आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय,आज सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत. खालच्या सभागृहा बद्दल येथे बोलण्याचा काही प्रश्न नाही. परंतु हे विसरता येणार नाही की खालच्या सभागृहाच्या इच्छेवर वरच्या सभागृहाचे अस्तित्व आहे.

काही सन्माननीय सदस्य : तसे नाही.

श्री.कपिल पाटील : आपण घटना तपासून पहा .गोंधळाबद्दल किंवा असंसदीय आयुधाबद्दल आपण कधीही समर्थन करीत नाही आणि या सभागृहामध्ये मी तेही करु इच्छित नाही.संसदीय आयुधेच वापरली गेली पाहिजेत आणि गोंधळ न घालता शांततेत सभागृहाचे कामकाज झाले पाहिजे याबद्दलही कोणतीही शंका नाही.नवीन शासन सत्तेवर आल्यानंतर या सभागृहाच्या अपेक्षा देखील वाढलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांचा पारदर्शकपणा आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांचा विकासाचा धडाका याबद्दलही शंका घेण्याचे कारण नाही परंतु पारदर्शकता आणि विकासाचा धडका एवढयावरच सभागृह आणि हे राज्य चालू शकत नाही. हे राज्य संसदीय लोकशाही पध्दतीने चालावयाचे असेल तर विरोधी पक्षाला विश्वासात घ्यावे लागेल. चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त कराव्या लागतील परंतु विरोधी पक्षाला बाजूला ठेवून सभागृहाचे कामकाज चालविणे हे संसदीय लोकशाहीच्या परंपरेला अनुसरुन नाही, आपल्या सभागृहात तर बिलकूलच नाही. कोण चूक आहे आणि कोण बरोबर आहे याची चर्चा मी करु इच्छित नाही. परंतु विरोधी पक्ष जर सभागृहात उपस्थित नसेल आणि आपण जर सभागृहाचे कामकाज चालवणार असू तर ते प्रथेला व नैतिकतेला धरुन होणार नाही.मी नियमांचा कीस पाडत नाही . सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या सदस्यांना एकत्र करुन यातून मार्ग काढण्यासाठी आणि सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी आपण प्रयत्न करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

.त्याचबरोबर माझी सत्ताधारी बाजूला देखील अशी विनंती आहे की , आपणही दोन पावले पुढे जावे. कोण चूक आहे आणि कोण बरोबर आहे हा येथे मुद्दा नाही. परंतु सर्वांनी मिळून हा गाडा हाकावयाचा असेल तर विरोधी पक्षाला सोडून आपण राज्य चालवू शकतो असे म्हणणे देखील बरोबर होणार नाही. कै. यशवंतराव चव्हाणां पासून आपली परंपरा आहे. त्यांची शिकवण आपण आचरणात आणत असतो. त्यांच्या स्मारकावर त्यांची अनेक वाक्ये लिहिलेली असतात त्यामध्ये विरोधकाबद्दल कै. यशवंतराव चव्हाण यांनी आदराचा उल्लेख केलेला दिसून येतो. विरोधी पक्षाच्या सहमतीने हे सरकार चालले पाहिजे, हे राज्य चालले पाहिजे अशी भूमिका कै. यशवंतराव चव्हाण यांची होती. माननीय सभापती महोदयांना माझी अशी विनंती आहे की त्या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत आणि मार्ग काढावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या ठिकाणी जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे त्यामध्ये जरी सत्यता असली तरी लोकशाही प्रणालीमध्ये या सभागृहाचे एक विशिष्ट स्थान आहे. मी सुध्दा त्या नियमांचा आणि घटनेतील तरतदींचा कीस पाडू इच्छित नाही. परंतु या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा आणि रुढी आहेत तसेच या सभागृहाचे एक विशिष्ट स्थान आहे म्हणूनच या सभागृहाला वरचे सभागृह म्हणून संबोधण्यात येते.खालच्या सभागृहामधील पडसाद वरच्या सभागृहामध्ये कसे उमटतात आणि त्याचा आधार घेऊन अशा पध्दतीने येथे जर काही घडत असेल तर आम्ही काही नवीन प्रथा येथे सुरु करीत आहोत काय

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

हा देखील या निमित्ताने माझ्यासमोर असलेला प्रश्न आहे. जे काही घडले आहे ते फार चांगले आहे असे आमच्यापैकी कुणाचेही मत नाही. तर घडलेली घटना ही लोकशाहीमध्ये दुर्दैवी आहे. दुर्दैवी हा शब्द मी मुद्दाम वापरला आहे. परंतु या बाबतीत शासनाकडून प्रयत्न होत नाहीत असे समजण्याचे कारण नाही. या ठिकाणी माननीय सभापती आहेत, माननीय अध्यक्ष आहेत, माननीय मुख्यमंत्री आहेत, माननीय उप मुख्यमंत्री हे सर्वजण या विषयावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्या दिवशी मी ज्यावेळी त्यांच्या समवेत बसलो होतो त्यावेळी त्यांच्या भूमिकेला माझा पाठिंबा नव्हता, परंतु त्यांच्या लोकशाही प्रणालीला माझा पाठिंबा होता. विधानसभेमध्ये ज्या गोष्टी घडल्या त्याला माझा पाठिंबा म्हणून मी त्या ठिकाणी जाऊन बसलेलो नाही. त्यांच्या लोकशाहीच्या भूमिकेला माझा पाठिंबा आहे हे मी सभागृहामध्ये सांगितले आहे. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, या सभागृहाच्या ज्या प्रथा आणि परंपरा आहेत त्या पाळल्या गेल्या पाहिजेत. विधानसभेचे कामकाज त्यांनी आपल्या पध्दतीने चालवावे हा त्यांचा प्रश्न आहे. परंतु आपल्या या सभागृहामध्ये अधिक चांगल्या पध्दतीने बजेट मांडण्यात आले, इतक्या सुंदर वातावरणामध्ये बजेटचे वाचन झाले,अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये बजेटचे वाचन सुरु असतांना कोणतीही घोषणा देण्यात आली नाही, आपल्या जागेवरुन उठून कुणीही कोणत्याही प्रकारचा आपला आक्षेप नोंदविला नाही तरी सुध्दा या वरिष्ठ सभागृहातील विरोधी बाकावरील आपले सहकारी सन्माननीय सदस्य आज सभागृहात अनुपस्थित असल्याचे दिसत आहेत याचे मला थोडेसे आश्चर्य आणि खेद वाटत आहे आहे याची आपण नोंद घ्यावी. आपणा सर्वांना हेही माहीत आहे की, त्यांना एकत्र आणल्याशिवाय बजेट पास होणार नाही. लोकशाही प्रणालीमध्ये या सर्व गोष्टींचे महत्व नमूद कले आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, यामधून सर्वांना मान्य होईल असा तोडगा निघावा आणि विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य त्यांच्या आसनावर यावेत असे आमचे सुध्दा मत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन 2011-12 चा अर्थसंकल्प माननीय उप मुख्यमंत्री व अर्थ मंत्री हे विधानसभेच्या सभागृहामध्ये मांडण्यासाठी उभे राहिले त्यावेळी विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी त्या सभागृहात जो काही गोंधळ घातला, त्यामुळे त्या सभागृहाने एकमताने 11 सदस्यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव संमत केला.

सभापती महोदय, विधानसभेमध्ये जी काही घटना घडली त्या घटनेचा पुरस्कार आपल्या सभागृहामधील माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी करावा आणि त्यासाठी जी पध्दत अवलंबिली आहे ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. माणिकराव ठाकरे....

चुकीची आहे असे मला वाटते. अशा प्रकारची घटना या पूर्वी कधीही घडली नव्हती. परंतु दोन्ही सभागृहामधील विरोधी पक्षाचे माननीय सदस्य आम्ही यापुढे सभागृहातील कामकाजामध्ये भाग घेणार नाही अशा प्रकारचा निर्णय घेऊन एक नवीन परंपरा कायम करु पहात आहेत हे योग्य आहे काय? अशा वेळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एखाद्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर यापुढे बर्हिगमन करुन थांबणार नाही तर सर्व कामकाज सोडून सभागृहाच्या बाहेर निघून जाण्याचे प्रकार सुरु होतील. तेव्हा अशाप्रकारची प्रथा-परंपरा विरोधी पक्षाकडून पाडली जाणे चुकीचे आहे.

सभापती महोदय, कोणत्या विषयाच्या संदर्भात हे पाऊल उचलण्यात आले आहे? त्या ठिकाणी पूर्व नियोजित अशाप्रकारचे वातावरण निर्माण करुन सभागृह बंद पाडण्याचा प्रयत्न करणे, माननीय अर्थ मंत्री सभागृहामध्ये बजेट मांडीत असतांना ते मांडू न देणे, ते लोकांपर्यंत ऐकू जाणार नाही अशाप्रकारची व्यवस्था करणे हे लोकशाहीच्या परंपरेला धरुन नाही. यामध्ये शिक्षेचा भाग महत्वाचा आहे. त्या ठिकाणी कमी - अधिक शिक्षा काय करावयाची असेल ती सभागृह एकत्रितपणे बसून करील. परंतु अशाप्रकारची घटना पुन्हा कुठेही होऊ नये या संदर्भात सुध्दा विरोधी पक्षाला तशाप्रकारचा संदेश आणि सूचना आपणाकडून गेली पाहिजे. विरोधी पक्षाने यापूर्वी अनेक वेळा सभागृहामध्ये उपस्थित राहून आपला निषेध नोंदविला आहे, व तो नोंदविता येतो त्याकरिता सभागृहाच्या बाहेर राहून निषेध नोंदविण्याचे प्रकार पुन्हा होऊ नयेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे . . . .

लोकसभेचे अधिवेशन सुरु असताना सुध्दा विरोधी पक्षाने सभागृहामध्ये राहून 14 दिवस कामकाज होऊ दिले नाही. शेवटी लोकसभेतील सन्माननीय सदस्यांना सुध्दा असे म्हणता आले असते की, आम्ही सगळेजण सदनाच्या बाहेर निघून जातो आणि आम्हाला यापुढे सदनाच्या कामकाजामध्ये भागच घ्यावयाचा नाही. परंतु याठिकाणी जे घडत आहे, त्यामुळे बाहेर चुकीचे संदेश जातील म्हणून याबाबतीत सुध्दा दखल घेणे गरजेचे आहे असे मला वाटते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण जेव्हा याठिकाणी विधान परिषदेतील कामकाजा विषयी परंपरा आणि संकेत याबाबत बोलतो, तेव्हा खरे म्हणजे विधान परिषदेचे अस्तित्व वरिष्ठ सभागृह म्हणून वेगळे आहे.विधानसभेमध्ये घडलेल्या घटनांचे काही पडसाद या सभागृहामध्ये उमटणे स्वाभाविक आहे.परंतु यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे राज्याच्या अर्थसंकल्पाचे संपूर्ण भाषण या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अतिशय शांतपणे ऐकून घेतले. त्यावेळी त्यांनी कोणताही विरोध केला नव्हता. त्यानंतर ज्यावेळी आपण विधान परिषदेचे कामकाज नियमितपणे सुरु केले, त्यावेळेला एकूणच पक्षीय राजकारणाच्या दृष्टीकोनातून बहिष्कारासारखे हत्यार विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून विधान परिषदेमध्येही वापरले जाते ही निश्चितच सभागृहाच्या परंपरेला साजेशी गोष्ट आहे असे कोणीही म्हणणार नाही. एकूणच विधान परिषदेमध्ये होणाऱ्या चर्चा, येथे उपस्थित होणारे प्रश्न यासाठी सभागृहामध्ये विरोधकांची उपस्थिती असणे ही एक आवश्यक बाब म्हणूनच आपण सर्वांनी गृहीत धरली पाहिजे. अशावेळी विधानसभेमध्ये घडलेल्या घटनांशी या सभागृहातील कामकाजाचा संबंध बाजूला ठेवावा आणि सभापती महोदय, आपण आणि आपल्या वरीष्ठ सभागृहातील गटनेते आणि सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य यांनी एकत्र येऊन आपल्या सभागृहाच्या कामकाजामध्ये तरी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सहभागी व्हावे अशा प्रकारची जर त्यांना आपल्याकडून सूचना करता आली आणि त्या दृष्टीकोनातून काही कार्यवाही करता आली तर सत्ताधारी पक्षाच्या बाजूचे सर्व सन्माननीय सदस्य निश्चितच याला पाठिंबा देतील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो मुद्दा मांडला, त्यासंदर्भात मी बोलत आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाबरोबरच विरोधी पक्षाचे स्थान सुध्दा महत्वाचे आहे. परंतु त्याचबरोबर ही गोष्ट सुध्दा अत्यंत आवश्यक आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . . .

सत्ताधारी पक्षाने आपली कामे व्यवस्थित करावीत, त्याचप्रमाणे विरोधी पक्षाने सुध्दा आपली कामे व्यवस्थित करावीत. परंतु विधानसभेमध्ये या राज्याचा अर्थसंकल्प मांडत असताना, उप मुख्यमंत्री सन्माननीय श्री.अजितदादा पवार यांना अर्थसंकल्प मांडावयास न देणे, तो जनतेपर्यंत पोहोचू न देणे यासाठी सातत्याने ठरवून गोंधळ निर्माण करणे . . ..

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला माझे म्हणणे मांडू द्यावे. इतर सन्माननीय सदस्यांना म्हणणे मांडण्यासाठी वेळ दिला आहे.

सभापती : मी इतर सन्माननीय सदस्यांना सुध्दा एक ते दीड मिनिटांचाच वेळ दिलेला असून तुम्हाला देखील तेवढाच वेळ दिलेला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी देखील माझे म्हणणे एक-दोन मिनिटांमध्ये संपविणार आहे. अशा प्रकारे त्यांनी नियोजन करुन, ठरवून हा अर्थसंकल्प बाहेर जाऊ न देण्याची कामगिरी तेथे बजावण्याचे काम केलेले आहे. त्यानंतर विधानसभेमध्ये जो काही निर्णय घ्यावयाचा तो घेतला. परंतु त्याचा विधान परिषद सभागृहाशी काहीही संबंध नसताना सुध्दा येथील विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकणे म्हणजे आम्ही बाहेर काहीही गोंधळ घालावयाचा, एखाद्याने कधीही काहीही करावयाचे आणि मग आम्ही सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकत आहोत असे सांगून सरकारची अडवणूक करावयाची आणि त्या निमित्ताने सरकारला, सभागृहाला आणि सभापती महोदय आपल्याला सुध्दा वेठीस धरावयाचे, अडचणीमध्ये आणावयाचे हा प्रकार विरोधी पक्षाला अजिबात शोभनीय नाही. या सभागृहाशी ज्या गोष्टीचा संबंधच नाही, त्यासाठी या सभागृहाला वेठीला धरण्याचे काहीही कारण नाही. म्हणून माझी उलट मागणी अशी आहे की, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून अशा प्रकारचे जे वर्तन केले जात आहे, त्याबद्दल आपण त्यांना समज दिली पाहिजे. कारण आपल्याला माहिती आहे की, विधानसभा बंद झालेली असताना सुध्दा आपण सभागृहाचे कामकाज एक आठवडा पुढे घेतलेले आहे. कारण आपले निर्णय स्वतंत्र असतात, आपले कामकाज स्वतंत्र असते. त्यामुळे विधानसभेच्या कामकाजाशी आपला काहीही संबंध नसताना देखील विनाकारण या सभागृहामध्ये विरोधी पक्षांनी मुद्दा उपस्थित करुन शासनाला, सभागृहाला वेठीस धरलेले आहे, त्याबद्दल त्यांना समज देण्यात यावी असे माझे या निमित्ताने म्हणणे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आपल्या वक्तव्यामध्ये "शासनाला, सभागृहाला वेठीस धरले आहे" असा उल्लेख केला आहे. मी "वेठीस धरले आहे" हे शब्द कामकाजातून काढून टाकत आहे.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, आज पर्यंतच्या सगळया प्रथा आणि परंपरा बघितल्या तर विधानसभेचे आणि विधान परिषदेचे कामकाज नेहमी वेगवेगळया पध्दतीने चालते. अनेक वेळा विधान परिषदेचे कामकाज तहकूब झाले तरी विधानसभेचे कामकाज सुरु असते. काही वेळा विधानसभेचे कामकाज तहकूब झाले तर विधान परिषदेचे कामकाज सुरु असते. पण सगळा घटनाक्रम बघितला तर विधानसभेमध्ये अंदाजपत्रक सादर करताना, पूर्व नियोजित अशा पध्दतीने सभागृहात बॅनर आणि पोस्टर्स आणून अंदाजपत्रकावरील भाषण होऊ द्यावयाचे नाही अशा पध्दतीच्या घेतलेल्या भूमिकेमुळे विधानसभेने काही निर्णय घेतलेले आहेत आणि विधानसभेच्या काही सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्यानंतर सुध्दा एक दिवस विधान परिषदेचे कामकाज व्यवस्थित सुरु होते, विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य सुध्दा सभागृहात उपस्थित होते. पण आज अचानकपणे विरोधी पक्षांनी या सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार घालण्याची घेतलेली भूमिका निश्चितपणे अनाकलनीय आहे. या सभागृहामध्ये असे काय घडले आहे की, ज्यामुळे विरोधी पक्षाने या सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे.? सभापती महोदय, ही केवळ राजकीय भूमिका असू शकते. या बाबतही सरकारची निश्चितपणे चर्चा करण्याची तयारी आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी आम्हाला चर्चेसाठी बोलावले तर शासन निश्चितपणे चर्चेसाठी पुढाकार घेईल.

सभापती महोदय, आपण या शासनाला केवळ दोन पाऊले पुढे जावयास सांगितले आहे. पण जेवढी पाऊले आवश्यक आहेत तेवढी पाऊले पुढे जाण्याची शासनाची तयारी आहे. पण जाणूनबुजून राजकीय भूमिका घेतली जात आहे. त्याबाबतीत सभापती महोदय, आपणच लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. प्रश्नोत्तरासारखा महत्वाचा तास आहे. एक-एका प्रश्नासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. सभागृहातील दिवसभराच्या कामकाजासाठी जनतेचे पैसे मोठया प्रमाणात खर्च होत आहेत. सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकून पायऱ्यावंर बसण्याची घेतलेली भूमिका ही लोकशाहीवादी भूमिका आहे असे मानता येईल काय? काही अडचणी असतील, काही प्रश्न असतील तर चर्चा करण्यासाठी हे सभागृह आहे. पण सभागृहामध्ये उपस्थित न रहाता, पायऱ्यांवर बसून राहणे, अशा प्रकारे पायऱ्यांवरची आणि रस्त्यावरची लोकशाही या राज्याला न शोभणारी आहे. त्यामुळे विरोधी पक्षाला सुध्दा आमचे आवाहन आहे की, त्यांनी त्याच्या अडचणी सभागृहात येऊन सांगाव्यात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील.....

सभापती महोदय, विधानसभेमध्ये समतोल निर्माण झालेला आहे. त्यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी गट नेत्यांची एक बैठक घेतली होती. माननीय अध्यक्षांचे, माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांचे या परिस्थितीतून मार्ग काढण्याचे निश्चितपणे प्रयत्न सुरु आहेत. विरोधकांनी सुध्दा दोन पाऊले पुढे येण्याची भूमिका घेतली पाहिजे. शासन या बाबतीत सकारात्मक आहे. लोकशाहीत विरोधी पक्षाचे स्थान आम्हाला कळते. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य आज या सभागृहात उपस्थित नाहीत, या गोष्टीचे आम्हाला दु:ख होत आहे. पण ही भूमिका त्यांनी राजकीय दृष्टया घेतली असेल तर प्रश्नोत्तरासारखा महत्वाचा तास सुरु करण्यात यावा. त्याचा सभागृहाच्या कामकाजावर काहीही परिणाम होता कामा नये. विधान परिषदेने सुध्दा विधानसभेसारखे आपले कामकाज सुरुळीतपणे सुरु ठेवावे. माझ्या माहितीप्रमाणे विधानभेतील विविध पक्षांच्या गट नेत्यांची आज दुपारी पुन्हा बैठक बोलावली आहे. या बैठकीत मार्ग निघेल अशी अपेक्षा आहे. विधानसभेचे कामकाज सुरु आहे. तेव्हा विधान परिषदेतील देखील प्रश्नोत्तराच्या तासाचे कामकाज सुरु करावे, अशी मी शासनाच्या वतीने सभापती महोदय, आपल्याला विनंती करतो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एक अत्यंत महत्वाचा मुद्दा या ठिकाणी मांडलेला आहे. संसदीय लोकशाहीमध्ये सदनाचे कामकाज सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांमधील समन्वयावर चालते. सन्माननीय मंत्री, श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे आता पर्यंतच्या प्रथा, परंपरा बघितल्या तर या दोन्ही सभागृहामध्ये एकाच पध्दतीने काम व्हावे, अशा प्रकारची अपेक्षा कधीच नसते. काही वेळा विधान परिषदेतील कामकाज काही तांत्रिक बाबींमुळे तहकूब होते त्यावेळी विधानसभेचे कामकाज चालू असते. काही वेळा विधानसभेचे कामकाज तहकूब होते, पण विधान परिषदेचे कामकाज चालू असते. दिनांक 23 मार्च, 2011 रोजी माननीय राज्य मंत्र्यांनी विधान परिषदेत अंदाज पत्रक सादर केले त्यावेळी संपूर्ण सभागृहाने ते अत्यंत शांततेने समजून घेतले आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आणि माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी या ठिकाणी आपले विचार मांडलेले आहेत. मी या सभागृहात येण्यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुडकर व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या दोघांनाही चर्चेसाठी बोलावले होते.

यानंतर श्री. बरवड.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

मी त्यांच्या बरोबर चर्चा केली. मी त्यांना अशी विनंती केली की, आपण आपल्या सर्व सहकाऱ्यांसह सभागृहात येणे गरजेचे आहे आणि त्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर माझ्या माहितीप्रमाणे विधानसभेचे माननीय अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते, गट नेते यांची माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले त्या पध्दतीने चर्चा झालेली आहे. माननीय उप सभापती श्री. वसंतराव डावखरे यांनी मला मघाशी भेटून सांगितले की, त्यांना अध्यक्षांनी खाली बोलावले आहे. मी त्यांना सांगितले की, आपण खाली जावे. त्यांची जी चर्चा झाली असेल तीही आपण जाणून घेऊ. माझी या पीठासनावरुन माननीय विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा विनंती आहे की, या लोकशाहीच्या मंदिरामध्ये आपण सगळे उपस्थित राहून सगळ्या चर्चेमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीनेच मघाशी त्यांना बोलवून मी हीच विनंती केलेली आहे. आज सभागृहासमोर जे कामकाज आहे त्या अनुषंगाने आपण या पूर्वीच निर्णय घेतलेला आहे की, प्रश्नोत्तराचा तास अत्यंत महत्वाचा आहे आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये प्रश्नोत्तराचा तास थांबवावयाचा नाही. बाकी काही असेल ते आपण नंतर बघू. आता आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करु. सन्माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे विधानसभा सभागृहामध्ये सुध्दा प्रश्नोत्तराचा तास सुरु होता. म्हणून आता आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करु. या चर्चेमध्ये आता जवळजवळ 21 मिनिटे गेलेली आहेत त्यापैकी दहा मिनिटे मी प्रश्नोत्तरासाठी जरुर वाढवून देईन.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

नांदेड येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ.स्वाती बालाजी तेलंग यांचा झालेला संशयास्पद मृत्यू

(१) * १२७४७ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ.स्वाती बालाजी तेलंग यांचा दिनांक १८ डिसेंबर, २०१० रोजी संशयास्पद मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २८ डिसेंबर, २०१० रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलीस अधीक्षक नांदेड, यांना सदरहू प्रकरणी चौकशी करणेबाबत लेखी पत्र दिले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संपूर्ण चौकशी झाली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) दिनांक १७/१२/२०१० रोजी गळफासाने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

(२) लोकप्रतिनधींनी लेखी तक्रार दिली आहे.

(३) व (४)

सदर प्रकरण फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे गु.र.नं. ३३९/२०१०, भा.द.वि.कलम ४९८ (अ), ३०४(ब), ३०६, ३४ सह हुंडाबंदी अधिनियम चे कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपींना अटक करण्यात आली. या गुन्ह्यासंदर्भात दिनांक १५/२/२०११ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या संदर्भात माझी एक सूचना आहे. विधानसभा सभागृहाच्या कामकाजामध्ये या संदर्भात एक दुरुस्ती केलेली आहे. अनेक वेळा प्रश्न विचारले जातात आणि प्रश्न विचारणारे सदस्य काही कारणामुळे सभागृहात येऊ शकले नाहीत आणि एखादा महत्वाचा प्रश्न असेल तर तो घेतला जातो. या ठिकाणी सुध्दा प्रश्न घेतले जावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती : या सदनामध्ये सुध्दा आम्ही असा निर्णय घेतलेला आहे की, एखादे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसतील तरीही त्यांचा प्रश्न ही सभागृहाची प्रॉपर्टी होते म्हणून ते सभागृहात उपस्थित नसले तरी त्यावर सभागृहात चर्चा होऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सदरचा प्रश्न उपस्थित करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12747.....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 12747.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ज्या डॉक्टरांचा संशयास्पद मृत्यू झालेला आहे त्या नांदेड शहरातील स्त्री रोग तज्ज्ञ आहेत. या गुन्हेगारांना कडक शासन व्हावे या बाबत आपल्या खात्यातर्फे कोणती दक्षता घेण्यात येणार आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील डॉ. स्वाती यांचा विवाह 1 मार्च, 2009 रोजी झाला होता. विवाह झाल्यानंतर सातत्याने सासरचे लोक पैशाची मागणी करीत होते. या जाचाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केलेली आहे. या गुन्ह्यामध्ये असणाऱ्या सर्व आरोपींवर कलम 498 (अ), 304 (ब), 306, 34 सह हुंडाबळी अधिनियमाच्या कलम 3 व 4 प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या राज्यामध्ये भविष्य काळात अशा पध्दतीच्या घटना घडू नयेत म्हणून महिलांवरील अत्याच्याराच्या संदर्भात जस्टीस धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमलेली आहे. त्या समितीचा अंतरिम अहवाल आलेला आहे परंतु अंतिम अहवाल आल्यानंतर त्यामध्ये असणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल. आपल्याकडे महिलांच्या अत्याचाराविरोधात विशेष सहाय्य कक्ष आहे. महिलांसाठी शासनाची स्वतंत्र हेल्पलाईन आहे. एकूणच भविष्य काळात अशा घटना होऊ नये यासाठी सामजिक दृष्टीकोन देखील बदलणे ही काळाची गरज बनलेली आहे. म्हणून जस्टीस धर्माधिकारी यांचा अहवाल आल्यानंतर त्यामध्ये ज्या ज्या सूचना असतील त्यांची अंमलबजावणी निश्चितपणे केली जाईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12747.....

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, सदरहू घटना 17 डिसेंबर, 2010 रोजी घडलेली आहे, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. परंतु प्रश्नामध्ये 18 डिसेंबर, 2010 रोजीचा उल्लेख केलेला आहे. या घटनेबाबत तक्रार करण्यात आली होती की नाही, या गुन्ह्याबाबत ज्यांना अटक करण्यात आली आहे त्यात कोण कोण आहेत, यासंबंधी आवश्यक ती चौकशी करण्यात आली होती का ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, पोलिसांना दिनांक 17 रोजी माहिती मिळाली आहे. त्यामुळे ताबडतोब गुन्हा दाखल करण्यात आल्यावर दिनांक 18 रोजी आरोपींना अटक केलेली आहे. आता सुध्दा हे आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून त्यांच्याविरुध्द दोषारोप पत्र दाखल केलेले आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ AKN/

बीड जिल्ह्यातील एका मुलीवर झालेला बलात्कार

(2) * 13302 ॲड. उषा दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामनाथ मोते, श्री.संजय केळकर, श्री.नागो गाणार, श्री.भगवान साळुंखे : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) म्हासळ पिंपळगाव (ता.गेवराई जि.बीड) येथील शेतवस्तीवर राहत असलेल्या एका मतिमंद मुलीवर गंगावाडी येथील दोन नराधमांनी बलात्कार केल्याची घटना माहे डिसेंबर, 2010 रोजी वा त्यादरम्यान घडली हे खरे आहे काय,

(2) तसेच मौजे निर्मळवाडी (ता.जि.बीड) या पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावातील शेतवस्तीवर मूकबधीर मुलीवर दहावीतील मुलाने बलात्कार केल्याची घटना दिनांक 28 जानेवारी, 2011 रोजी वा त्या सुमारास घडली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) होय. प्रस्तुत घटना दिनांक 22/12/2010 रोजी घडली आहे.

(2) होय, प्रस्तुत घटना दिनांक 27/1/2011 रोजी घडली आहे.

(3), (4) व (5)

(अ) मौ.म्हासळ पिंपळगाव येथील घटनेबाबत दिनांक 22/12/2010 रोजी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस स्टेशन गेवराई येथे गु.र.नं.202/2010, भा.द.वि. कलम 376 (2)(ग) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात 2 आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(ब) मौ.निर्मळवाडी येथील घटनेबाबत प्राप्त तक्रारीनुसार पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 11/2011, भा.दं.वि. कलम 376 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील आरोपी विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याने त्यास मा.अध्यक्ष बाल न्याय मंडळ, बीड यांच्या आदेशानुसार बाल सुधार गृहात पाठविण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, गेवराई तालुक्यातील म्हासळ पिंपळगांव येथील शेत वस्तीवर एक मतिमंद मुलगी राहते. तिचे आई-वडील शेतावर गेल्यावर ती कोठ्यावरच रहात असते. त्या ठिकाणी येऊन दोन नराधामांनी तिच्यावर बलात्कार केल्याची घटना घडलेली आहे. त्याचप्रमाणे निर्मळवाडी येथे सुध्दा 16 वर्षाच्या मुलाने मूकबधीर मुलीवर बलात्कार केलेला आहे. या दोन्ही प्रकरणांमध्ये आरोपींविरुध्द गुन्हे दाखल झालेले आहेत, त्यांना अटक केलेली आहे

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असाही लेखी उत्तरात उल्लेख आहे. या आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन त्यांना एलसीबीकडे प्रोडयूस केले आहे काय, या मुलींच्या पुनर्वसनासाठी शासन त्यांना कोणती मदत करणार आहे, म्हासळ पिंपळगांव, गंगावाडी येथील घटनेमधील आरोपींना जामीन मिळाला आहे काय, नसेल तर तो मिळू नये यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, बीड जिल्ह्यात ह्या दोन्ही अतिशय दु:खद घटना घडलेल्या आहेत. त्यापैकी एक मुलगी मतिमंद व दुसरी मुलगी मूकबधीर व अपंग आहे. या मुलींच्या एकाकीपणाचा गैरफायदा घेऊन या आरोपींनी दुष्कृत्ये केलेली आहेत. त्यांच्यावर तातडीने गुन्हे नोंद करुन त्यांना अटकही केलेली आहे. या आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी म्हणून त्या कुटुंबाच्या वतीने ज्या वकिलांची मागणी केली जाईल असे वकील नेमले जातील आणि त्यांना जामीन मिळणार नाही या बाबतची दक्षता निश्चितपणे घेतली जाईल.

श्री.जयप्रकाश छाजेड : बीड जिल्ह्यातील मतिमंद मुलींवर बलात्कार झाल्याच्या ह्या दोन घटना आहेत. गेल्या 15 दिवसापूर्वी सुध्दा पनवेलमध्ये मतिमंद मुलांच्या आश्रमामध्ये महिलांवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. ह्या अतिशय गंभीर घटना आहेत. परमेश्वरांना त्यांच्या बुध्दीमध्ये काही तरी कमी ठेवले आहे, त्यांना बोलता येत नाही. अशा मुलींवर बलात्कार झाल्याच्या घटना राज्याला न शोभणा-या आहेत. म्हणून अशा गुन्ह्यांबाबत वेगळा कायदा करुन आरोपींना कडक शिक्षा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. 15 दिवसापूर्वी नवी मुंबईतील अशा प्रकारचे एक प्रकरण उघडकीस आले होते, हे खरे आहे. ज्या संस्थेला पूर्वी अनुदान मिळत होते, परंतु अलीकडच्या काळामध्ये त्यांचे अनुदान बंद झाले आहे. अशा संस्थांमध्ये मुलींना ठेवल्यानंतर त्यांच्यावर बलात्कार झाल्याच्या घटना घडल्याचे स्पष्ट झालेले आहे. ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे की, महिला व बालकल्याण विभागाने यावर सुपरव्हिजन ठेवणे आवश्यक आहे. पण ती यंत्रणा अपुरी पडत आहे. म्हणून अशी जी मतिमंद मुले आहेत त्यांचे सर्वेक्षण करणे, ते सुरक्षित आहेत की नाही हे बघणे, यासाठी काही वेगळ्या उपाययोजना करणे ही

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काळाची गरज बनली आहे. जेथे अशी वसतिगृहे आहेत, तेथे अशा मुली ठेवल्या जातात त्या ठिकाणी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी किमान सहा महिन्यात एकदा त्या वसतिगृहाला भेट देऊन त्या मुलींची सुरक्षितता पाहणे या बाबतीत शासन वेगवेगळया विभागांशी संपर्क ठेवून काही वेगळा निर्णय घेऊ इच्छित आहे. ह्या सगळया बाबी शासनाच्या विचाराधीन आहेत.

श्री.हेमंत टकले : शासन महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याची व्यवस्था करीत आहे. परंतु या राज्यातील विशेषत: अपंगामध्ये ज्यांची गणना होते अशा मुलींचा हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर स्वरुप धारण करीत आहे. ह्या घटना कोणत्या तरी वस्तीवर घडत आहेत. त्या मुलींना तेथून कोठे जायचे आहे याचे मार्गदर्शन सुध्दा मिळत नाही. म्हणून प्रत्येक जिल्ह्यातील समाजकल्याण अधिकाऱ्यांनी अपंग कल्याणाचा कार्यक्रम राबविताना आपल्या जिल्ह्यातील मतिमंद, अपंग, मूकबधीर अशा कॅटेगरीतील मुलींची नोंद घेऊन त्यांच्यासाठी विशेष मोहिम राबविली पाहिजे.

यानंतर श्री.शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे समुपदेशन करुन त्यांची सुरक्षित राहाण्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने काही वेगळी उपाययोजना शासन करील काय, त्यासाठी निश्चित असा कार्यक्रम शासन हाती घेईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : या 15 दिवसामध्ये राज्यामधील घटना ज्या पध्दतीने उघडकीस आलेल्या आहेत त्या बघितल्या नंतर अतिशय गांभीर्याने महिला व बाल कल्याण विभागा मार्फत उपाययोजना करण्यात येतील. या मुलीच्या सुरक्षिततेसाठी शासना मार्फत सकारात्मक पावले उचलली जातील.

श्री. विक्रम काळे : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुलींच्या बाबतीत या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. या प्रकरणी गुन्हेगाराला कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने शासना मार्फत चांगला प्रॉसिक्युटर देण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

सभापती : मंत्री महोदयांनी हे मान्य केलेले आहे.

श्री. आर.आर.पाटील : मी सांगितलेले आहे की, या मुलींच्या पालकांनी जिल्ह्यातील कोणत्याही चांगल्या वकिलाची मागणी केली तर तो वकील शासना मार्फत दिला जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुलींचे पालक गरीब, अशिक्षित आहेत. ते वकिलाची मागणी देखील करण्यासाठी पुढे येणार नाही. या केसमध्ये चांगले वकील दिले जावेत या दृष्टीने एस.पी.ना सूचना देण्यात येतील.

श्रीमती अलका देसाई : या केसमध्ये शासना मार्फत चांगला वकील देण्यात येईल त्या बद्दल शासनाला मी धन्यवाद देते. ज्या अपंग मुलींवर बलात्कार झालेला आहे त्यांचे आर्थिक पुनर्वसन कसे करणार हा प्रश्न आहे. मतिमंद मुलींवरील बलात्कार आणि अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. गेल्या 6 महिन्यामध्ये असंख्य घटना पुढे आलेल्या आहेत. पनवेलमध्ये घडलेल्या घटनेबाबत येथे चर्चा देखील झालेली आहे. या आरोपींना फासावर देण्यात येईल काय ? अशा प्रकारची कठोर शिक्षा केल्या शिवाय अशा घटना थांबणार नाहीत. या मतिमंद मुलींना स्वत:ला किती यातना असतात हे आपण पहातो. तेव्हा मतिमंद मुलींवर बलात्कार करणा-यांना फासावर लटकविण्याचा कायदा शासन करील काय, करणार नसल्यास, तो कायदा करावा अशी माझी मागणी शासन मान्य करील काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : आरोपीला फासावर देण्याचे अधिकार सरकारला नाहीत. परंतु आरोपीला कठोरातली कठोर शिक्षा झाली पाहिजे या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी देखील सहमत आहे. गुन्हा शाबीत होऊन आरोपींना शिक्षा होईल या दृष्टीने प्रयत्न केले जातील. ती कुटुंबे आर्थिकदृष्ट्या गरीब असतील तर जिल्हाधिका-यांकडून तसा अहवाल मागवून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत केली जाईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(३) * १२७७६ श्री.परशुराम उपरकर , श्री.रामदास कदम , डॉ.दिपक सावंत , श्री.सुभाष चव्हाण , श्री.विजय सावंत , श्री.हुसेन दलवाई , श्री.राजन तेली : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाटात आयसीआयसीआय बँकेच्या रोख रक्कम वाहतूक करणाऱ्या गाडीला लुटण्याकरिता स्फोट घडवल्याप्रकरणी अटकेत असलेले श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली लोकरे यांनी दोन वर्षापूर्वी पलायन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोपी श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली लोकरे यांना पोलीसांनी परत पकडले असता सावंतवाडी जेलमधून तुरुंगाची कौले काढून दिनांक १४ जानेवारी, २०११ रोजी वा त्यासुमारास पलायन केले ते अद्याप फरारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) सदर आरोपी पलायन करणार असल्याची पूर्ण माहिती सावंतवाडी जेलमधून पुणे जेलमध्ये स्थलांतरीत केलेल्या आरोपींनी पुणे जेलच्या अधिकऱ्यांना दिली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या माहितीनुसार अधिकाऱ्यांकडून सावंतवाडी जेलची तपासणी केली असतांनाही जेल अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे व दुर्लक्षामुळे आरोपी पलायन करु शकले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सदर आरोपीला अटक करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील : (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) होय.

(५) व (६) प्रस्तुत प्रकरणी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या तुरुंग अधिकारी श्रेणी-१, सुभेदार व रक्षक ह्या ३ कर्मचाऱ्यांना दि.१४/०३/२०११ रोजी निलंबित केले आहे. त्यांच्याविरुध्द तसेच अन्य दोषी कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे. न्यायाधीन बंदी ज्ञानदेव उर्फ माऊली जगन्नाथ लोकरे यांनी दिनांक १४.०१.२०११ रोजी पलायन केले आहे. यासंदर्भात सावंतवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.७/२०११ भा.द.वि.कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बंदयाचा शोध पोलीसांमार्फत चालू आहे.

श्री. सुभाष चव्हाण : लोकरे नावाच्या आरोपीने सावंतवाडी जेलमधून तुरुंगाची कौले काढून पलायन केलेले आहे. या प्रकरणी तुरुंग अधिकारी आणि अन्य अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आह, आरोपीला अटक करण्याची कारवाई सुरु आहे, असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. या बाबतीत पोलीसांनी काय कारवाई केलेली आहे, हा आरोपी पोलिसांना कधी सापडेल ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील :ही गोष्ट खरी आहे की, हा एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी आहे. हा न्यायालयीन बंदी सिंधुदुर्ग तुरुंगात बंदी होता. तो एकदा तेथून पळून गेला. पळून गेल्याचा गुन्हा त्याच्यावर नोंद झाला. पोलिसांनी त्याला नंतर पकडले. त्याच्या पळून गेल्याचा गुन्हा देखील शाबीत झालेला आहे. ज्या मूळ गुन्ह्यासाठी पोलिसांनी त्याला पकडले तो गुन्हा कोर्टामध्ये सिद्ध व्हायचा आहे. हा आरोपी एकदा पळून गेला होता. पोलिसांनी पुन्हा त्याला पकडले. एवढे सगळे माहीत असताना त्या आरोपी बाबत जी दक्षता घ्यायला पाहिजे होती ती न घेतल्या बाबत जेल कॉन्स्टेबल श्री. जाधव, तुरुंग अधिकारी श्री. कदम, सुभेदार श्री. भडकमकर या तिघांना निलंबित केलेले असून जिल्हा पोलीस दल आरोपीचा कसून शोध घेत आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : श्री. ज्ञानेश्वर लोकरे या आरोपीवर गंभीर स्वरुपाचे 42 गुन्हे आहेत. सिंधुदूर्ग शहरातील बँकेचे पैसे दुसरीकडे नेत असताना ते पैसे लुटण्याचा त्याने प्रयत्न केला होता. सांगली, सातारा येथील जेल अधिकाऱ्यांनी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जेल अधिका-यांना हा गंभीर स्वरुपाचा आरोपी आहे, तो आरोपी अतिशय हुशार आहे, तसेच तो जेलमधून कधीही पलायन करु शकतो अशी माहिती दिली होती. एवढेच नव्हे तर सांगली आणि सातारा येथील जेल अधिकाऱ्यांनी त्या आरोपीस आमच्या ताब्यात देण्यात यावे अशीही मागणी सिंधुदुर्गच्या जेल अधिकाऱ्यांकडे केली होती. दुर्देवाने या आरोपीवर लक्ष ठेवून कारवाई करावयास पाहिजे होती, तशी कारवाई केली गेली नाही. या आरोपीकडे दुर्लक्ष केले गेले. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत म्हणून शासन काय कार्यवाही करणार आहे ? सिंधुदुर्ग येथील जेल हे अतिशय जुने आहे. त्या ठिकाणी नवीन जेल बांधण्यात येत आहे. परंतु ते गेल्या पाच वर्षापासून सुरु आहे. अद्यापही ते काम अपूर्ण आहे. हे संस्थान काळातील जेल आहे, अतिशय जुना असा जेल आहे. तसेच हा जेल वस्तीच्या ठिकाणी आहे. सदर जेलचे बांधकाम लवकर पूर्ण करण्यात येऊन तेथे सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, होय. जेल नूतनीकरण व तुरुंगांची नवीन बांधकामे या बाबतचा कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. एक गोष्ट खरी आहे की, महाराष्ट्रातील एकूण जेलची क्षमता आहे, त्यापेक्षा अधिकचे कैदी या जेलमध्ये ठेवावे लागतात. जेलमधील सुविधा दुर्देवाने वाढलेल्या नाहीत. महाराष्ट्रातील काही जेलमध्ये क्षमतेपेक्षा अधिकचे कैदी ठेवावे लागत आहेत. जेलसाठी मंजूर असलेला कर्मचारीवर्ग तेवढाच आहे, आरोपींची संख्या मात्र दुप्पट होते आहे, त्यामुळे त्या कैद्यांवर नियंत्रण ठेवताना कर्मचाऱ्यांना अडचणी येतात. राज्यातील काही जेल अतिशय जुन्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्या जेलचे गज हाताने काढू शकतात, भिंती देखील हाताने फोडू शकतात, इतक्या जेलच्या इमारती जुन्या झालेल्या आहेत. जेलची संख्या वाढविणे, जेलच्या जुन्या इमारती आहेत, त्या दुरुस्त करणे, कैद्यांच्या प्रमाणाप्रमाणे जेल कर्मचा-यांच्या संख्येत वाढ करणे, हया तिन्ही उपाययोजना शासनाने हाती घेतलेल्या आहेत आणि त्याची कार्यवाही सुरु आहे. जे कैदी जेलमधून पळून गेले होते, अशा अट्टल कैद्यांना पोलिसांनी वेळोवेळी पकडलेले आहे. त्याप्रमाणे हा आरोपी लवकरात लवकर पकडला जावा अशा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारच्या सूचना मी पोलीस दलाला दिलेल्या आहेत. या आरोपीने आजपर्यंत अनेक समाज विघातक कृत्ये केलेली आहेत. हा आरोपी बाहेर राहणे हे समाजाच्यादृष्टीने योग्य नाही. हा आरोपी पकडणे आणि त्यास सिंधुदूर्ग येथे न ठेवता दुसरीकडे ठेवण्यात येईल. सिंधुदुर्ग येथील जेलची संपूर्ण दुरुस्ती झाल्याशिवाय खतरनाक आरोपी त्या ठिकाणी न ठेवता अन्य जिल्हयात त्यांना शिफ्ट करु. साधारणत: पळून न जाणारे आरोपी आहेत, अशा आरोपींनाच त्या जेलची इमारत दुरुस्त होईपर्यंत ठेवू.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील ही जेल संस्थानांच्या काळातील आहे. जेलची इमारती जुनी असल्यामुळे इमरतीच्या वरच्या बाजूला कौले आहेत. जेलचे अधिकारी बाहेर पहारा देत असले तरी कैदी कौले काढून पळून जाऊ शकतात. अशा घटनांमुळे जेल अधिकारी आणि कर्मचारी यांच्या चुका नसताना भरडले जात आहेत. म्हणून कौलाच्या ठिकाणी स्लँब किंवा ग्रील टाकण्याची व्यवस्था ताबडतोबीने केली जाईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बांधकाम व्यवसायातील चांगल्या प्रकारची माहिती आहे. सदर जेलच्या इमारतींच्या दुरुस्तीचे एस्टीमेट करु, त्यावेळी त्यांचे मार्गदर्शन निश्चितपणे घेऊ. सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये मा.न्यायालयाने काही निवाडे दिलेले आहेत. त्या निवाडयांमुळे पोलिसांना अडचणी निर्माण होत आहेत. मानवी हक्क आयोगा सारख्या बाबी केल्या जातात. कैद्यांना कोर्टात नेताना बेडया घालावयाच्या नाहीत. कैद्यांना ठेवण्यात येत असलेल्या खोल्यांना बाहेरुन कडी लावावयाची नाही, अशा गोष्टी पोलिसांना पाळाव्या लागत आहेत. मला या ठिकाणी खेदाने सांगावेसे वाटते की, गुन्हेगार म्हणून पोलिसांकडून पकडले जातात. परंतु शासनाकडून कैद्यांवर केला जाणारा खर्च रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुरापेक्षा जास्त आहे. टुथपेस्ट पासून सगळया गोष्टी कैद्यांना सरकारतर्फे पुरविल्या जातात. कैद्यांना थोडे जरी जेवण खराब मिळाले तर अनेक यंत्रणा त्यास प्रसिध्दी देतात. कोर्टामध्ये नेताना कैद्यांना बेडया घालावयाच्या नाहीत. पोलिसांचा अडचणींचा गैरफायदा कैद्यांकडून घेतला जातो. हा आरोपी एकदा पळून गेला होता. नंतर त्यास तरुंगात नेताना त्याला बेडया घालता आल्या नव्हत्या, कारण बेडया घालण्याचे अधिकार पोलिसांना नाहीत. पोलिसांना आणि गार्डना सुध्दा काही अधिकार देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

म्हणून जे न्यायालयाचे निर्देश आहेत त्या सगळ्या निर्देशाबाबत आम्ही तज्ज्ञांचे मार्गदशन घेऊन न्यायालयाला फेर विनंती करु, जेणेकरुन असे आरोपी पळून जाणार नाहीत.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील ओरस येथील तुरुंगाचे बांधकाम सात वर्षापासून सुरु आहे. 90 टक्के काम पूर्ण झाले असून 10 टक्के बांधकाम हे निधी अभावी पूर्ण झालेले नाही. त्यामुळे निधी उपलब्ध करुन देऊन अट्टल गुन्हेगारांना प्रतिबंध करण्यात येईल काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, निधीच्या उपलब्धतेप्रमाणे काम करावे लागते. अनेकदा जेलसाठी जागा उपलब्ध होत नाही. काही वेळेला पोलीस स्टेशन मंजूर करावे अशी मागणी केली जाते. आपल्या तालुक्यात शासकीय इमारत व्हावी अशी लोकप्रतिनिधींकडून मागणी केली जाते. परंतु कोणत्याही सदस्याकडून माझ्या मतदारसंघात किंवा जिल्हयात जेल उभारण्यात यावी अशी मागणी आजपर्यंत माझ्याकडे करण्यात आलेली नाही. अशी कोणी मागणी केली आणि गरज असेल तर तेथे नवीन जेल निर्माण करण्याचा शासनाचा विचार आहे. सिंधुदुर्ग येथील जेलचे अपूर्ण बांधकाम चालू आर्थिक वर्षात निधी देऊन लवकरात लवकर पूर्ण केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लासलगाव (जि.नाशिक) बाजार समितीत शेतकऱ्यांची सुमारे २५ कोटी रुपयांची झालेली फसवणूक

(४) * १३८५६ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव (जि.नाशिक) बाजार समितीत शेतकऱ्यांची वजनात फसवणूक करुन सुमारे २५ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : (१) व (२) नाशिक जिल्ह्यातील लासलगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक १५२/२०१० मध्ये दि.०७.१२.२०१० रोजीच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.८/१/२०११ रोजी बाजार समितीला समक्ष भेट दिली. राबविण्यात येणारी लिलाव प्रक्रिया, कांदा आवक व इतर कागदपत्रांची त्यांच्याकडून तपासणी केली असता, सन २००४-०५ पासून डिसेंबर, २०१० पर्यंत कांद्याच्या वजनात क्विंटलमागे दोन किलो कपात केल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे सत्यस्थितीदर्शक प्रतिज्ञापत्र दि.१३.०१.२०११ रोजी मा.न्यायालयात दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रात, महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतुदीनुसार शेतकऱ्यांच्या शेतमालामधून अशा प्रकारे २ किलो कपात कोणत्याही घटकास करता येत नाही.

नाशिक जिल्ह्यातील कांदा या शेतमालाची आवक मोठ्या प्रमाणावर होत असल्याने वजनमाप करण्याकरिता भुईकाट्यांचा वापर केला जातो. बहुतांश बाजार समितीच्या आवारात स्वमालकीचे भुईकाटे कमी आहेत. सदरचा कांदा संबंधित खरेदीदारांच्या गोदामावर घेऊन जाताना व त्याठिकाणी तो खाली करताना वाहनाच्या टायरखाली खराब होऊन नुकसान होते. या कारणास्तव व्यापारी व शेतकरी यांनी परस्पर सोईस्कर मार्ग काढून प्रति क्विंटलमागे २ किलो कपात सुरु केलेली होती, असे प्रतिज्ञापत्र नमूद केले आहे.

२ किलो कपात बंद करण्याबाबत पणन संचालनलयाने बाजार समितीस वेळोवेळी आदेशीत केलेले आहे. त्यानुसार लासलगांव कृषी उत्पन्न बाजार समितीत दि.०१.०२.२०११ पासून क्विंटलमागे २ किलो कांदा कपात बंद करण्यात आली आहे.

प्रस्तुत जनहित याचिकेचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१३८५६.....

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विकावयास आणलेल्या शेतीमालाच्या वजनामध्ये शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. हे प्रकरण कोर्टात गेल्यानंतर न्यायालयाने निर्देश दिले आहेत. संपूर्ण राज्यात शेतकऱ्यांचा शेतीमाल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये वजन करण्यासाठी येतो तेव्हा वजनामध्ये कटती केली जात आहे का? असल्यास त्या बद्दल कोणती उपाययोजना केली जात आहे? शेतकऱ्यांकडून सेस वसूल करण्याऐवजी तो खरेदीदारांकडून वसूल करण्यात यावा असा निर्णय शासनाने पूर्वी घेतला होता. त्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी का होत नाही?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील सर्वच मार्केट कमिट्यांमध्ये अनेक वर्षापासून ही पध्दत अंमलात होती. शेतकरी आणि व्यापारी यांच्या सहकार्यानेच ही प्रक्रिया सुरु होती. मध्यंतरीच्या काळात श्री.नानासाहेब पाटील या शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यांनी कटती पध्दत बंद करण्याची मागणी केली होती. अद्याप हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयाच्या सूचनेनंतर पणन संचालकांनी चौकशी केली. 2004-05 पासून कटती पध्दत सुरु होती, आता डिसेंबर, 2010 पासून ही बंद करण्यात आली आहे. अशा प्रकारे कोणत्याही मार्केट कमिटीला कटती करता येणार नाही असे शासनाने आदेश दिले आहेत. त्या आदेशाची कठोरपणे अंमलबजावणी सुरु आहे. राज्यामध्ये दोन प्रकारे सेस वसूल केला जातो. एकदा मार्केटमधून माल बाहेर पडला की पुन्हा सेस भरावा लागतो. मार्केट कमिटीमध्ये सेस भरला असला तरी गावात माल आल्यानंतर पुन्हा सेस भरावा लागतो अशा प्रकारची तक्रार आलेली आहे. निश्चितपणे दोन ठिकाणी सेस भरण्याची बाब उचित नाही. या बाबत राज्य शासनाच्या स्तरावर लवकरच धोरणात्मक निर्णय केला जाईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, नाशिक जिल्हयाचा हा प्रश्न आहे. या प्रकरणात दोन जणांवर कारवाई केलेली आहे. अशा प्रकारच्या पध्दतीमुळे आतापर्यंत जवळपास 25 कोटी रुपयांचा अपहार झाल्याचे सकृत्दर्शनी दिसून आल्याचे पणन संचालकांनी कबूल केले आहे.

नंतर जे.1..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13856..... श्री. राजन तेली.....

सन 1997 पासून अशा प्रकारे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, पण अद्यापही कोणावर कारवाई केली नाही. त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समिती आहे तेथे दलाल मोठ्या प्रमाणात गोंधळ घालतात. आमच्या भागात सुध्दा अद्यापही दलाल रुमालाच्या खाली हात घालून भाव ठरवितात व शेतकऱ्यांची फसवणूक करतात, या अनुषंगाने शासन कोणती कारवाई करणार आहे ? त्याचबरोबर महामँगोसंबंधीचा प्रस्ताव अद्यापही शासनाकडून मान्य केला जात नाही. त्यासंदर्भात सभागृहात माननीय सभापतींनी निदेश दिले होते तेव्हा सुध्दा मंत्री महोदयांनी या विषयाबाबत दोन महिन्यात निर्णय घेतला जाईल असे उत्तर दिले होते. या गोष्टीला आता चार वर्षे होऊन सुध्दा महामँगोसंबंधीचा निर्णय होत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे, याप्रकरणी चालढकल करणाऱ्या संचालक, पणन यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : महोदय, यामध्ये कारवाईचा प्रश्नच नाही. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला त्यानुसार कोणत्याही प्रकारची अफरातफर झालेली नाही. उलट शेतकरी व व्यापारी या दोघांनी ही पध्दत पूर्वीपासूनच मान्य केलेली होती. पण त्यासंदर्भात तक्रार आल्यानंतर कारवाई केली व आता ही कटती पध्दत बंद झालेली आहे. तसेच मापाई व तोलाईच्या संदर्भात व्यापाऱ्यांनी अशा प्रकारे कोणतीही कटती करु नये अशाही सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत. त्यात अपहार केला असे नाही. या बाबतीत शासनाने अतिशय चांगले धोरण घेतल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महामँगो प्रकल्पाबाबत विचारलेला आहे. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांबरोबर एक बैठक घेण्यात येईल आणि कोणत्या स्तरावर या प्रकरणी हलगर्जीपणा झालेला आहे हे पाहून त्या अनुषंगाने जरुर कारवाई करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : महोदय, कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची जी फसवणूक होत आहे त्या गोष्टीला वाचा फोडली आहे. कारण महामँगोच्या संदर्भात सभागृहात आश्वासन देऊन आणि माननीय सभापतींनी निदेश देऊन सुध्दा याबाबतचा निर्णय झालेला नाही. तथापि कोणावरच कारवाई सुध्दा झाली नाही. माननीय मंत्री महोदय उत्तर देताना असे सांगत आहेत की, या प्रकरणी कारवाईचा प्रश्नच नाही. मग एक गोष्ट मंत्री महोदयांनी खात्रीने सांगावी

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13856..... श्री. भाई जगताप.....

की आजही कांदा अथवा इतर कोणतीही फळ पिके, ज्याप्रमाणे कोकणात रुमालाखाली हात घालून दलाल लोक आंब्याचे भाव ठरवितात, ती पध्दत बंद झाली की कसे, नसेल तर रुमालाखाली हात घालून भाव ठरविण्याची सध्या चालू असलेली पध्दत बंद करण्याचे मंत्री महोदय घोषित करणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, कांद्याच्या कटतीबद्दलचा हा मूळ प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यात महामँगोसंबंधीचा प्रश्न विचारलेला आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबत तक्रारी असतील तर त्या अनुषंगाने बैठक घेण्यास तयार आहेत.

श्री. भाई जगताप : महोदय, मार्केट कमिट्यांच्या अनुषंगाने सभागृहात अनेक वेळा प्रश्न विचारत असताना अनुषंगिक प्रश्नांना उत्तरे दिली जातात. अर्थात मंत्री महोदयांना कांद्याच्या प्रश्नामध्ये महामँगोच्या प्रश्नाला उत्तर द्यायचे नसेल तर त्यांनी तसे सांगावे. आम्ही अन्य माध्यमातून त्याबाबतचा प्रश्न विचारु.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, कायद्याप्रमाणे आज कोणत्याही मार्केट कमिटीमध्ये रुमालाखाली हात टाकून भाव ठरविण्याची पध्दत अस्तित्वात नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांची स्पेसिफिक तक्रार असेल तर ज्या मार्केट कमिटीमध्ये असा प्रकार चालू असेल त्याबाबत शासन स्तरावरुन कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / परिशुध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 13856.....

श्री. विनायक मेटे : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे की, "बाजार समितीमध्ये दोन किलोचा व्यवहार 1997 पासून सुरु होता". पणन संचालकांनी बाजार समितीला भेट दिली असता हा प्रकार उघड झाल्याचे आढळून आले होते व त्यामुळेच या संदर्भातील कारवाई करण्यात आली व हा प्रकार 1.2.2011 पासून बंद झालेला आहे. 1997 ते 2011 पर्यंत सातत्याने शेतक-यांची लूट चालली होती. बाजार समितीने करोडो रुपयांची शेतक-यांची लूट केलेली आहे. असे असताना सुध्दा मंत्री महोदय म्हणतात की, या संदर्भात कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, शेतकरी आणि बाजार समितीच्या सहमतीने ही सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत बाजार समितीने जी दोन किलोची कटती केली होती त्या दोन किलोचे आतापर्यंतचे पैसे शेतक-यांना परत करण्यात येणार आहे काय, मनमानी पध्दतीने संचालक मंडळ निर्णय घेते त्यांच्यावर आपण काही कारवाई करणार आहात काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील सर्व पार्श्वभूमी मी आपल्याला थोडक्यात सांगतो. पूर्वी नाशिक जिल्हयात कांद्याचे वजन घोडी काटयावर होत होते. जिल्हयातील पहिला इलेक्ट्रॉनिक भुई काटा लासलगाव बाजार समितीने 27.8.1996 रोजी बसविला होता. हा नवीन इलेक्ट्रॉनिक भुई काटा बसविल्यामुळे काही प्रश्न निर्माण झाले होते. या भुई काटयाच्या संदर्भात पहिल्याने माथाडी कामगारांनी संप केला होता. नाशिक जिल्हयामध्ये कांदा हा गोणीत भरुन न आणता तो ट्रॅक्टरच्या ट्रॉलीतून मोकळया पध्दतीने आणला जातो. भुई काटयावरुन जेव्हा व्यापा-याच्या वखारीवर कांदा आणला जातो तेव्हा काही कांदा रस्त्यामध्ये सांडला जात होता. त्यामुळे या ठिकाणी दोन टक्के कपातीची पध्दत शेतकरी आणि व्यापा-यांनी मिळून ठरवलेली होती. यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचा कोठेही संबंध येत नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत ही तडजोड ठरविण्यात आली नव्हती. 1997 पासून शेतकरी आणि व्यापा-यांनी हा प्रकार सुरु केला होता. जेव्हा यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका सादर करण्यात आली तेव्हा उच्च न्यायालयाने या संदर्भात पणन संचालकांना चौकशी करण्याचे आदेश दिले व चौकशी नंतर हा प्रकार उघडकीस आला. या संदर्भात शासनाने,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 13856.....

श्री. प्रकाश सोळंके....

डीडीआर व बाजार समितीने यापुढे दोन किलोची कपात केली जाऊ नये यासंदर्भात आदेश काढले होते. दोन किलोचा जो काही प्रकार आहे तो शेतकरी आणि व्यापा-यांच्या संगनमताने झालेला असल्यामुळे या प्रकरणात नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, व्यापारी आणि शेतकरी परस्पर निर्णय घेत असतील तर मार्केट कमिटया कशासाठी आहेत, मार्केट कमिटया शेतकऱ्यांकडून सेस कशासाठी घेतात, शेतक-यांची लूट करण्यासाठी मार्केट कमिटया हे सर्व करीत आहेत काय ? या प्रश्नाच्या संदर्भात चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. पणन संचालकांनी जी कारवाई केलेली आहे त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भातील पार्श्वभूमी मी सविस्तरपणे अगोदरच सांगितलेली आहे. 1997 पासून दोन किलोची कटती शेतकरी आणि व्यापा-यांच्या संगनमताने सुरु होती. परंतु ज्यावेळेस उच्च न्यायालयाने यासंदर्भात पणन संचालकांना चौकशी करण्यास सांगितले व पणन संचालकांनी चौकशी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आल्यामुळे दोन किलोच्या कटतीला बंदी घालण्यात आलेली आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, बहुतांशी बाजार समितीच्या मालकीचे भुई काटे नसतात. भुई काटेच नसतील तर मार्केटचा उपयोग काय ? त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, टीएमसी किंवा इतर योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भुई काटे लावण्याच्या संदर्भातील कार्यवाही शासन करेल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. सुरेश देशमुख : सभापती महोदय, या सभागृहात बरेच शेतक-यांचे पुत्र आमदार म्हणून बसलेले आहेत. राज्यामध्ये अडत, हमाली व तोलाईचे पूर्ण दर राज्यात एकच आहेत काय ? दर सारखे नसतील तर यावर आपले नियंत्रण नाही काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13856....

श्री.प्रकाश सोळंके :सभापती महोदय, राज्यात प्रत्येक मार्केट कमिटीच्या क्षेत्राप्रमाणे अडतीचे दर वेगवेगळे आहेत. त्याचबरोबर काही मार्केट कमिटयांमध्ये भुसार माल येतो तर काही मार्केट कमिटयांमध्ये भाजीपाला येत असतो त्यामुळे अडतीचे दर वेगवेगळे आहेत.

श्री.सुरेश देशमुख : मी समान पिकाच्या संदर्भात विचारले होते.

श्री.प्रकाश सोळंके : त्यामध्येसुध्दा वेगवेगळे दर आहेत.सन्माननीय सदस्यांनी जो दोन खात्याच्या संदर्भात दुसरा प्रश्न विचारला आहे तो काही समजला नाही परतु त्याचा काही संबंध येत नाही.

श्री.सुरेश देशमुख :शेतामध्ये शेतक-याने राबावयाचे आहे आणि मार्केटमध्ये धान्य वा भाजीपाला नेल्यानंतर 15 ते 20 टक्के रक्कम मार्केट कमिटीकडून कापली जाते हे बरोबर नाही. समान पिकाच्या बाबतीत अडत्याचा दर शासनाकडून ठरविण्यात आला आहे ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये माथाडी कायदा लागू करण्यात आला आहे.त्यामुळे सगळया ठिकाणी हमालीच्या आणि मापा-याच्या दरासंबंधी प्रश्न उपस्थित होण्याचे काही कारण नाही. प्रत्येक मार्केट कमिटीचे उत्पन्न वेगवेगळे आहेत, त्याचबरोबर प्रत्येक मार्केट कमिटयांमध्ये शेती मालाची आवक वेगवेगळी असते त्यावर अडत्यांचे दर अवलंबून असतात. सन्माननीय सदस्यांची जर काही शंका असेल व त्या संदर्भात जर त्यांनी काही माहिती दिली तर त्याचा विचार करण्यात येईल परंतु प्रत्येक मार्केटमध्ये असलेले व्यापारी, अडते, तेथे येणारी आवक, येणा-या मालाचे प्रकार त्यावर ही आकारणी अवलंबून असते.महामँगोच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की डीडीआर मार्फत कलम 88 अन्वये कारवाई सुरु करण्यात आली आहे लवकरात लवकर चौकशी पूर्ण करुन त्या संदर्भातील आवश्यक ती कारवाई केली जाईल.

सभापती : माननीय मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, शेतक-यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा आहे. या पूर्वी काही वर्षे मी या विभागाचा मंत्री होतो. या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे ते वाचल्यानंतर दोन गोष्टी निदर्शनास येतात. 2004-2005 सालापासून ते 2010 सालापर्यंत कांद्याची प्रती क्विंटल दोन किलो कपात केली गेली त्यामुळे जवळजवळ 25 कोटी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13856....माननीय सभापती ..

रुपयांची शेतक-यांची फसवणूक झालेली आहे असा प्रश्नकर्त्या सन्माननीय सदस्यांचा अंदाज आहे. कदाचित तो अंदाज कमी जास्त असू शकेल. शेतकरी असंघटित असल्यामुळे एखादी रक्कम जर शेतक-यांकडून वसूल करावयाची असेल तर ती रक्कम मात्र तातडीने त्यांच्याकडून वसूल करण्याचा प्रयत्न केला जातो. सन्माननीय मंत्री महोदयांना माझी एवढीच विनंती आहे की, शेतक-यांकडून दोन किलो कांद्याची कपात करण्यात आलेली आहे. ती रक्कम शेतक-यांना कशी मिळेल हा अत्यंत महत्वाचा मुद्दा असल्यामुळे त्या दृष्टीने आपल्याला कोणते प्रयत्न करता येतील हे आपण तपासून पहावे. या संबंधी माझे कोणतेही निदेश नाहीत. या संदर्भात शासनाला आदेश निदेश वगैरे देणा-यापैकी मी नाही. फक्त सातत्याने शेतक-याच्या हिताच्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहणे जरुरीचे आहे.

या बाबतीत माझे दुसरे मत असे आहे की, या ठिकाणी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963 व नियम 1967 मधील तरतुदीनुसार शेतक-याच्या शेतमालामधून अशा प्रकारे दोन किलो कपात कोणत्याही घटकास करता येत नाही. कोणालाही अशा प्रकाराची कपात करता येणार नाही अशी तरतूद असताना दुर्देवाने शेतकरी असंघटित असल्यामुळे अशा प्रकारची कपातीची कु-हाड जर शेतक-यावर येणार असेल तर ती रोखण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. या दृष्टीने माननीय मंत्र्यांनी त्यामध्ये लक्ष घालावे अशी माझी माननीय मत्र्यांना सूचना आहे.

श्री.राधाकृष्ण विखे - पाटील : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनांच्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही गांभीर्याने केली जाईल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्याला सादर करण्यात येईल.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

ठाणे येथील कारागृहातील कैद्यांना न्यायालयातील सुनावणीला नेण्यासाठी पुरेसे पोलीस बळ नसल्याबाबत

(५) * १२८९७ डॉ.सुधीर तांबे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.हुसेन दलवाई , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.विजय सावंत , श्री.सुभाष भोईर , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कारागृहातील कैद्यांना न्यायालयातील सुनावणीला नेण्यासाठी पुरेसे पोलीस बळ नसल्याने न्यायालयातील प्रलंबित खटल्याची संख्या दिवसेंदिवस वाढतच असल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैद्यांच्या बंदोबस्तासाठी १ हजार ५४५ पोलिसांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात ३४० पोलीसच उपलब्ध असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारागृहातील बंदोबस्तासाठी पोलिसांची संख्या वाढविण्याबाबत व प्रलंबित खटले त्वरित निकालात काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१) हे खरे नाही.

(२) व (३), ठाणे मध्यवर्ती कारागृहातील न्यायबंदीना न्यायालयामध्ये कोर्टपेशीसाठी कारागृहातील मागणीनुसार अधिकारी व अंमलदारांचे मनुष्यबळ देऊन न्यायबंदीच्या कोर्टपेशीची पूर्णपणे पूर्तता करण्यात येते. तथापि, ठाणे कारागृहातील कैद्यांची न्यायालयात ने-आण करण्याकरिता पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे आस्थापनेवर अधिक पद निर्माण करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "तथापि, ठाणे कारागृहातील कैद्यांची न्यायालयात ने-आण करण्याकरिता पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे आस्थापनेवर अधिक पदे निर्माण करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे". ही कार्यवाही केव्हा पूर्ण होईल व त्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आपल्या राज्यातील काही जेल मध्ये ओव्हरलोड कैदी झाले आहेत, म्हणजे क्षमतेपेक्षा अधिक कैदी त्या जेल मध्ये झाले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKN/ KTG/

ता.प.क्र. 12897...

श्री. आर. आर. पाटील....

दुसरीकडे फॅसिलिटी नसल्यामुळे काही कैदी त्या ठिकाणी ठेवावे लागत आहेत. स्पष्ट सांगावयाचे झाले तर या ठाणे जेलची सद्याची क्षमता 1105 कैद्यांची असतांना आज 2525 कैद्यांना ठेवावे लागत आहे. ठाणे जेलच्या सद्याच्या क्षमते पेक्षा दुप्पट कैदी त्या ठिकाणी आहेत. त्यामुळे स्वाभाविकपणे त्या ठिकाणी मनुष्यबळ कमी पडत आहे. त्या वरील उपाय म्हणून व्हीडिओ कॉन्फरन्सिगव्दारे राज्याच्या 26 ठिकाणी व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेचा वापर करुन 20 हजार कैद्यांना व्हीडिओ कॉन्फरन्सिगव्दारे न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. या व्यवस्थेचा खूप चांगल्या प्रकारे उपयोग होत आहे. तरी सुध्दा जेलमधील कैद्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन ठाणे जेलसाठी पोलिसांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या वर्षी 11 हजार अतिरिक्त पदे भरली जाणार असून जेलची आवश्यकता लक्षात घेऊन त्या ठिकाणी अधिक मनुष्य बळ देण्यासाठी अधिकची पोलीस भरती केली जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निटूर (ता.निलंगा,जि.लातूर) या गावात गुप्तधनाच्या लालसेपोटी एका दहा वर्षाच्या शाळकरी मुलाला ६ फूट खड्यात पुरल्याबाबत

(६) * १३०४६ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निटूर (ता.निलंगा,जि.लातूर) या गावात गुप्तधनाच्या लालसेपोटी एका दहा वर्षाच्या शाळकरी मुलाला ६ फूट खड्यात पुरत असल्याचा प्रकार दिनांक २७ डिसेंबर, २०१० रोजी वा त्या सुमारास उघडकीस आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व तद्नुसार संबंधित मांत्रिकावर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१) नाही. तथापि तांत्रिक व आरोपींनी दाखविलेल्या खड्यामध्ये चिठ्ठी लिहून मुलास चिठ्ठीमध्ये लिहिल्याप्रमाणे खड्डयात गाडगे अगर भांडे दिसत आहे काय म्हणून पाहण्यास लावले त्यावरुन मुलाने माझ्या टयुशनचा टाईम झालेला आहे असे त्यांना सांगून घरी जाऊन वरील हकिगत आई वडील यांना सांगितली आहे.

(२) होय.

सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन शिरुर अनंतपाळ येथे गु.र.नं.१३०/२०१०, कलम १४३ ३४२ भा.दं.वि प्रमाणे व कलम ७ ड्रग ॲण्ड मॅजिक ॲक्ट १९५४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासात गुन्ह्यातील सर्व आठ आरोपींना अटक करण्यात येऊन तपास करण्यात आलेला आहे. अनोळखी मांत्रिकाचा शोध घेण्यात आलेला असून तो मिळून आला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, राज्याच्या विविध भागामध्ये अशाप्रकारच्या अघोरी प्रथा आपल्याला पहावयास मिळतात. उदा. देवीसमोर बोकड कापतांना त्याचे उडालेले रक्त कपाळाला गंध म्हणून लावून जय भवानीची घोषणा करणे, उंचावरुन लहान मुलाला झोळीत टाकणे, आणि तिसरा प्रकार अमावास्येच्या दिवशी नग्न स्त्रीला बसविणे आणि तिची पूजा करणे या अघोरी प्रथांचे पूर्ण उच्चाटन करण्यासाठी राज्य सरकार काही कायदेशीर उपाय योजना करणार आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKN/ KTG/

ता.प्र.क्र. १३०४७६....

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये जे प्रस्तावित कायदे अस्तित्वात आहेत त्यांची अंमलबजावणी करण्याची गृह विभागाची जबाबदारी असते. संबंधित समाज कल्याण विभागाने या पूर्वी अंधश्रध्दा निर्मूलनाचे विधेयक आणले होते. सदरचे विधेयक विधानसभेमध्ये संमत करण्यात आले, परंतु या सभागृहामध्ये ते थांबविण्यात येऊन संयुक्त चिकित्सा समितीपुढे विचारार्थ पाठविण्यात आले. त्या संदर्भातील संयुक्त समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यासंबंधी शासन योग्य तो निर्णय घेईल. या घटनेबाबत पोलिसांकडून योग्य ती कारवाई करण्यात आली आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सदरची घटना माझ्या मतदारसंघातील आहे. हा एक शालेय विद्यार्थी शाळेतून आपल्या घरी जात असतांना संबंधित मांत्रिकाने आणि इतर आठ जणांनी त्याला अडवून तेथील खड्डयामध्ये उतरविण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणी कारवाई केल्याचे उत्तरात म्हटले आहे. परंतु मांत्रिकासोबत असलेल्या आरोपींना पकडण्यात आल्याचे सांगितले आहे, त्यामध्ये मुख्य आरोपी असलेला मांत्रिक पळून गेला आहे, त्याचा अजून तपास लागत नाही. आपण त्या मांत्रिकाचा शोध किती दिवसात लावणार आहात आणि त्याच्यावर किती दिवसात कारवाई करणार आहात?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांना मांत्रिकाबद्दल फार कमी माहिती असल्याचे दिसते. ज्यांनी मांत्रिकाला बोलाविले होते त्यांनाही अटक केली व त्याचबरोबर मुख्य मांत्रिक शंकर हजारे याला देखील पोलिसांनी नंतर अटक केली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी मूळ प्रश्नाला "नाही" असे उत्तर देऊन पुढे "तथापि" असे म्हटले आहे. छापील प्रश्नाला "होय आणि नाही" असे उत्तर देण्याची शासनाची जी पध्दत आहे ती आपण बदलली पाहिजे. याचे कारण असे की, त्या ठिकाणी त्या मुलाला खड्डयामध्ये पुरण्याचा प्रयत्न दिसून येत आहे. असे असतांना सरळ "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. अशाप्रकारे या ठिकाणी "प्रश्न उद्भवत नाही" अशी उत्तरे देणे अधिकाऱ्यांना सोयीचे जाते. तेव्हा अशाप्रकारे प्रश्नाचे उत्तर देण्याची ही पध्दत शासनाने बदलली पाहिजे. मघाशी मंत्री महोदयांनी उत्तर देतांना अंध श्रध्दा विषयक विधेयक संयुक्त चिकित्सा समितीपुढे विचारार्थ असल्याचे सांगितले. परंतु त्या विधेयकालाच आक्षेप असल्यामुळे फक्त नरबळी आणि अघोरी प्रथांना आळा घालणारे नवीन विधेयक या अधिवेशनामध्ये आपण आणणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13046 . . . .

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदरहू विधेयक संयुक्त समितीसमोर असल्यामुळे परत तसा विषय येथे आणणे हे योग्य आहे काय, हे जरुर पाहिले जाईल. परंतु सुरुवातीलाच आम्ही जर उत्तरामध्ये दुरुस्ती केली असती तर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावा लागला नसता.परंतु मी आता उत्तरामध्ये दुरुस्ती करु इच्छितो की, "याठिकाणी मुख्य मांत्रिकाला पकडण्यात आले आहे."

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना काही विचारावयाचे आहे काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला उत्तर मिळालेले आहे.

सभापती : ठीक आहे.

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्ह्यातील वडखळ ते अलिबाग राज्यमार्ग चौपदीकरण करणेबाबत

(7) *13135 श्री.जयंत पाटील, श्री.कपिल पाटील : दिनांक 27 जुलै, 2010 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या 10 व्या यादीतील प्रश्न क्रमांक 2729 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग 17 पासून अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने केंद्र शासनाच्या प्रचलित योजनेनुसार वडखळ ते अलिबाग राज्यमार्गाचे चौपदरीकरण करणेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(2) असल्यास, सदर कामासाठी निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे तसेच निधी उपलब्धततेनुसार प्रत्यक्ष कामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (1),(2)व (3) सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम निधी, निकष व प्राथम्यक्रमा नुसार हाती घेण्याचे प्रयत्न राहतील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, वडखळ ते अलिबागपर्यंतच्या रस्त्याबाबत माझा प्रश्न आहे. एकतर त्या भागामध्ये औद्योगिक विकास झपाट्याने झालेला आहे आणि दुसऱ्या बाजूला मुरुड-जंजिऱ्याकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासाठी नेमका किती निधी उपलब्ध करुन दिलेला आहे ? कारण या ठिकाणी ढोबळ उत्तर दिलेले आहे की, निकषानुसार निधी मिळत असतो. परंतु आम्ही याबाबतीत माहिती विचारलेली नाही. याठिकाणी आम्ही स्पेसिफीक प्रश्न विचारलेला आहे की, वडखळ ते अलिबाग या राज्यमार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी किती निधी देण्यात येणार आहे, तसेच हा निधी किती दिवसामध्ये देण्यात येणार आहे? मघाशी निकषानुसार निधी मिळत असतो असे सांगितले आणि ते आम्हालाही समजते. मग याठिकाणी प्रश्नच कशासाठी उपस्थित करावयाचा असा मुद्दा आहे.त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफीक उत्तर द्यावे की, सदरहू रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी किती आणि कधीपर्यंत निधी उपलब्ध होईल ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वडखळ ते अलिबाग राज्यमार्गाबाबत प्रश्न विचारलेला आहे. हा रस्ता 22 कि.मी.चा असून सध्या 7 कि.मी.रस्त्याचे काम झाले आहे आणि सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, या रस्त्याचे चौपदरीकरण करावे, त्यासाठी तरतूद करावी.

. .. .एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आज जो रस्ता आहे, तो वाढविण्यासाठी प्रश्न विचारीत आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांचे म्हणणे मान्य आहे. पण या रस्त्यावर ट्रॅफीक डेन्सिटी आहे. अशा वेळी आपण तेथील ट्रॅफीक लोड लक्षात घेऊन ठरवितो की, कोणत्या रस्त्यांचे चौपदरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे किंवा तेथे दोन लेन ठेवणे आवश्यक आहे काय, आजच्या घडीला या पूर्ण रस्त्यावरील वाहतुकीचा विचार केला तर अलिबाग ते खोपोलीपर्यंत वाहतूक होत आहे. वडगाव ते खोपोली हा भाग इंडस्ट्रीअल एरियामध्ये येतो. खोपोलीपासून ट्रॅफीक नॅशनल हायवेला येऊन मिळतो. अशा वेळी तेथील ट्रॅफीक डेन्सिटी लक्षात घेऊन आम्ही त्या रस्त्याचे चौपदरीकरण केले आहे. या भागामध्ये आजच्या घडीला तेवढा ट्रॅफीक नाही.पण मी आपल्या सर्वांच्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छितो की, हा सर्व भाग एमएमआरडीएच्या हद्दीमध्ये येतो. त्यामुळे ज्यावेळी डीएमसीने या रस्त्याचे बी.ओ.टी.तत्वावर चौपदरीकरण केले, त्यावेळी एमएमआरडीए ला देखील एक प्रस्ताव दिला होता की,जर आपल्याला काम करावयाचे असेल तर ते पूर्ण रस्त्याचे करावे. परंतु या प्रस्तावाबाबत एमएमआरडीएने काही उत्तर दिलेले नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, जर आम्हाला हे काम करावयाचेच आहे तर ते बी.ओ.टी.तत्वावर करावे लागेल आणि सन्माननीय सदस्यांची अशी सूचना आहे की, या रस्त्याचे चौपदरीकरण केले पाहिजे. शेवटी अलिबाग येथे डिस्ट्रीक्ट हेडक्वॉर्टर आहे.त्यामुळे मघाशी सांगितल्याप्रमाणे ट्रॅफीक डेन्सिटी, ट्रॅफीक लोड इ.सर्व बाबी लक्षात घेऊन पुढील पावले उचलण्यात येतील.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मुंबई-गोवा नॅशनल हायवे क्रमांक 17 हा कोकणा मध्ये जाणारा रस्ता आहे. गेल्यावेळेस कोकणातील रायगड भागातील माननीय वित्त मंत्री असल्या मुळे त्यांनी मुंबई-इंदापूर पर्यंतच्या रस्त्याचे काम केले होते आणि पुढे झारापहून गोव्यापर्यंत रस्ता नेला होता. त्यांनी यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली होती. त्याबाबत आज सद्यस्थिती काय आहे, या रस्त्याच्या कामासाठी किती निधी देण्यात आलेला आहे, सदरहू काम कधी पूर्ण होणार आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरानुसार जर या रस्त्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चौपदरीकरण होत नसेल किंवा या संबंधातील निकष सदरहू रस्त्याच्या बाबतीत लागू होत नसतील तरी देखील आपण याचे रुंदीकरण करणार आहात काय? कारण सन्माननीय सदस्यांनी ज्याचा उल्लेख केला तो भाग खऱ्या अर्थाने अडचणीचा आहे. म्हणून हा रस्ता चौपदरीकरणाच्या निकषामध्ये बसत नसेल. अशा वेळी आपण या रस्त्याचे रुंदीकरण करणार आहात काय, त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, सदरहू रस्त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे. आम्ही याबाबतीत सर्व्हे करणार आहोत आणि त्यामध्ये गरज असल्याचे आढळून आले तर निश्चितपणे . . . .

श्री.विक्रम काळे (खाली बसून) : कधीपर्यंत सर्व्हे करणार ?

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या रस्त्याच्या बाबतीत सर्व्हे केल्यावर माहिती प्राप्त झाल्यानंतरच मग आम्ही लवकरात लवकर कार्यवाही करु.

. . . .एन-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाशीनगर (ता.अर्जुनी मोरगाव,जि.गोंदिया) या गावातील पोचमार्गाचे डांबरीकरण अनेक वर्षापासून रखडल्याबाबत

(8) *13514 श्री.केशवराव मानकर, श्री.नितीन गडकरी, श्री.पांडुरंग फुंडकर,श्री.संजय केळकर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नक्षलग्रस्त भागातील विकास कामांसाठी केंद्र शासनाकडून कोट्यवधी रुपयांचे अनुदान दरवर्षी देण्यात येत असले तरी गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील झाशीनगर या गावातील पोचमार्गाचे डांबरीकरण अनेक वर्षापासून रखडले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण त्वरित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही तसेच सदर कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (1), (2) व (3) प्रश्नाधीन झाशीनगर जोडरस्ता या डांबरी रस्त्याची एकूण लांबी 1.25 कि.मी.आहे. सदर रस्त्याच्या डांबरी नुतनीकरणाचे रू. 6.25 लक्षाचे काम मंजूर असून निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर काम मे, 2011 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागातील रस्त्याच्या संबंधीचा हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या डांबरी रस्त्याची एकूण लांबी 1.25 कि.मी. आहे. या रस्त्याचे काम बऱ्याच वर्षापासून प्रलंबित आहें. नक्षलग्रस्त भागासाठी मोठया प्रमाणात निधी देण्यात येऊनही त्या ठिकाणच्या रस्त्यांची कामे होत नसतील तर ती दु:खाची बाब आहे. असे उत्तरात असे म्हटले आहे की, "या रस्त्याचे काम दि.21 मे, 2011 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे". परंतु या रस्त्याचे काम इतके दिवस का करण्यात आलेले नाही, याबाबत संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागामध्ये जे पैसे येतात त्याचे नियोजन करुन जिल्हाधिकारी कामे प्रस्तावित करतात. झाशीनगरला जोडणारा हा रस्ता 1.25 कि.मी. चा रस्ता आहे. त्यापैकी 1/2 कि.मी रस्त्याचे काम जुन्या हेडमध्ये मंजूर झाले होते आणि ते काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित 0.7 कि.मी.रस्त्याचे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. दि.18/01/2011 ला या उर्वरित रस्त्याच्या कामाचे टेंडर काढण्यात आले आहे. मे, 2011 पर्यंत या रस्त्याचे काम पूर्ण होईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मला माझा औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिल्या बद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सदनासमोर आणू इच्छितो की, मुंबई विमानतळावर जेवढे कर्मचारी काम करतात त्यांना क्राईम ब्रँचकडून चारित्र्याचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. सभापती महोदय, अशा घटना मी या सभागृहाच्या वारंवार निदर्शनास आणून दिल्या आहेत. चारित्र्याचे प्रमाणपत्र घेतल्यानंतरच त्या कर्मचाऱ्यांना एंट्री पास मिळतो. कामावार जाताना या कर्मचाऱ्यांना तो पास दिला जातो आणि कामावरुन परत येताना तो पास परत घेतला जातो. पण या पासेसचा दुरुपयोग मागच्या दोन महिन्यापासून होत आहे. हे पासेस हरवल्यानंतर हे पासेस देणारी व्यवस्था संबंधित पोलीस स्टेशनकडे तक्रार करीत असते तसेच या बाबतीत एन.सी. कम्प्लेन दिली जाते. मागच्या दोन महिन्यात जवळ जवळ 30 पासेस गहाळ झालेले आहेत, ही गोष्ट मी तेथील डी.सी.पी. श्री. सत्यनारायण तसेच ए.सी.पी. यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. सभापती महोदय, अशा प्रकारे विमानतळावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पासेसे गहाळ झाले आणि ते जर दहशतवाद्यांच्या हाती लागले तर त्यातून मुंबईच्या विमानतळावर भयानक प्रकार घडू शकतो. या पूर्वी अशा घटना झालेल्या आहेत. श्री. अंबानी यांच्या हेलीकॉप्टरमधील इंधनाच्या टाकीमध्ये माती टाकण्यात आली होती. त्यामुळे एक मोठा अपघात झाला असता. या घटनेच्या बाबतीत संबंधित पदाधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. पण दोन महिन्यानंतर त्यांना सोडण्यात आलेले आहे. राज्य शासनाचे बहुसंख्य मंत्री विमानाने आणि हेलीकॉप्टरने प्रवास करतात. त्यामुळे गहाळ झालेल्या 30 पासेसचे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही तर या विमानतळावर दहशतवादी एखादी घटना घडवून आणू शकतात. या बाबतीत मी विमानतळ पोलीस स्टेशनचे ए.सी.पी., डी.सी.पी. यांच्या बरोबर चर्चा करुन देखील मार्ग निघत नाही. तेव्हा शासनाने यामध्ये लवकरात लवकर लक्ष घालावे आणि हे पासेस सध्या कोणाच्या कस्टडीमध्ये आहेत याबाबतची माहिती या सदनाला देण्यात यावी.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी या ठिकाणी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे तो या राज्याच्या आणि देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. सन्माननीय गृह मंत्री थोडया वेळा पूर्वी या सभागृहात उपस्थित होते. पण आता ते सभागृहातून बाहेर गेलेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी या औचित्याच्या मुद्याची एक प्रत मला द्यावी तसेच एक प्रत सन्माननीय गृह मंत्री श्री. आर.आर. पाटील यांना द्यावी. या औचित्याच्या मुद्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी माझ्या दालनात येऊन मला ब्रीफ केले होते. त्याप्रमाणे त्यानी मंत्री महोदय, श्री. आर. आर.पाटील यांनाही त्यांनी ब्रीफ करावे. मी देखील याबाबतीत माननीय गृह मंत्र्यांना लिहितो. अशा प्रकारे आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करु. दिलेले सुरक्षा पासेस गहाळ होत असतील तर त्याचा छडा लावणे, हे एकूणच विमानतळावरील सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचा सन 2008-2009 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा सन 2009-2010 चा पाचवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादितचा सन 2009-2010 चा पाचवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचा सन 2009-2010 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील यांनी "दिनांक 1 मार्च, 2000 च्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्ती/स्वेच्छा सेवानिवृत्ती/राजीनामा/ मृत्युमुळे रिक्त पदे भरण्यास बंदी असतानाही फादर ॲग्नेल टेक्निकल हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज, वांद्रे (प.) या संस्थेत शिक्षकांच्या नेमणुका करणे तसेच शैक्षणिक पात्रता नसतानाही उमेदवारांच्या नेमणुका करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 25.3.2011 रोजी सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने पेपर क्रमांक 6 ऐवजी पेपर क्रमांक 5 चे वाटप केल्यामुळे विद्यार्थ्यांचा उडालेला गोंधळ, बी.ए. भाग-3 मधील इंग्रजी विषयाच्या प्रश्न पत्रिकेतही झालेल्या चुका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईसह विविध शहरातून अनाथश्रमातून अनधिकृतरित्या अर्भके गायब होत असल्याच्या वाढलेल्या घटना, अनाथश्रमे दांपत्याकडून मोठी रक्कम घेऊन मुली दत्तक घेत असल्याचे वाढत असलेले प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "नगरविकास विभाग व महसूल विभागाच्या विद्यमाने ठाणे शहरामध्ये स्पेशल टाऊनशिप योजना राबविण्यात येणे, घोडबंदर रोड येथील मौजे कावेसर व कोळसे येथील 88 एकर शासकीय भूखंड एका खाजगी विकासकाला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारामुंब्री मच्छीव्यवसाय सह.संस्था, देवगड, या संस्थेच्या मच्छीमारी नौकेला एन.सी.डी.सी. योजनेंतर्गत केलेला कर्ज पुरवठा, कर्जदार थकित कर्जदार असल्याने त्यांना निवडणुकीसाठी देण्यात येत असलेली अनुचित परवानगी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासबंधी

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, यानंतर आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील अनुक्रमांक सहा वरील सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 5 आधी चर्चेला घ्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा)

L.A. BILL NO. V OF 2011.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY LOCAL FUND AUDIT ACT, 1930.)

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 5 मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 5 मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र.5 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 5 संमत झाले आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नाशिक जिल्ह्यातील धोंडेगांव येथील रचना ट्रस्ट आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय

मु. शी. : नाशिक जिल्ह्यातील धोंडेगांव येथील रचना ट्रस्ट आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, परशुराम उपरकर, वि.प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

3.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

पृ. शी. : खान्देशातील (जळगांव, धुळे, नंदुरबार) आदिवासी बांधवांना शेत जमिनी मिळण्याच्या संदर्भात आदिवासी वनहक्क कायद्याची अंमलबजावणी न होणे

मु. शी. : खान्देशातील (जळगांव, धुळे, नंदुरबार) आदिवासी बांधवांना शेत जमिनी मिळण्याच्या संदर्भात आदिवासी वनहक्क कायद्याची अंमलबजावणी न होणे यासंबंधी श्री.अरुण गुजराथी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खान्देशातील (जळगांव,धुळे,नंदुरबार) आदिवासी बांधवांना केंद्र व राज्य शासनाने अतिक्रमीत शेतजमिनी मिळणेसंदर्भात केलेल्या आदिवासी वनहक्क कायद्याची अंमलबजावणी न होणे, हजारो आदिवासी बांधवांनी विविध स्तरांवर निषेध नोंदविणे, चोपडा तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांना फेब्रुवारी 2010 मध्ये घेराव करणे, लोकसंघर्ष मोर्चातर्फे या मागणीसाठी सातपुड्याच्या आदिवासींना उलगुलाल आंदोलनाला दिनांक 1 मार्च, 2011 पासून जळगांव येथून सुरुवात होणे त्यात हजारो आदिवासी बंधू व भगिनी सामील होणे, सदरचा मोर्चा 14 मार्चला मुंबईत पोहचून शासनाच्या उदासीनतेबद्दल निषेध करणे, स्थानिक अधिकाऱ्यांनी पात्र आदिवासींना जमिनी देणेसंदर्भात कायद्याची अंमलबजावणी न करणे, त्यामुळे आदिवासींमध्ये निर्माण झालेला तीव्र संताप व चीड त्यासंदर्भात शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावरील ही लक्षवेधी सूचना आहे. आदिवासींच्या वनहक्क कायद्यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. मंत्री महोदय संपूर्ण आदिवासी भागामध्ये फिरत असल्यामुळे त्यांना आदिवासींच्या प्रश्नांची जाणीव आहे. त्यांनी एका बैठकीमध्ये असे कबूल केले होते की, या कायद्याची अंमलबजावणी त्वरेने केली जाईल. आदिवासी शेतकऱ्यांना जमिनी द्यावयाच्या आहेत त्या दिल्या जातील. पण अद्यापपर्यंत आदिवासींना न्याय मिळालेला नाही. निवेदनातील तक्ता मंत्री महोदयांनी पहावा. त्यात असे नमूद केले आहे की, जळगांव जिल्ह्यातील 6511 दावे निकाली काढण्यात आले, त्यापैकी 1764 दावे मान्य झाले म्हणजे केवळ 22 टक्के दावे मान्य झाले, धुळे जिल्ह्यातील 21344 निकाली काढण्यात आले, या दाव्यापैकी 14,847 दावे मान्य झाले, याचे प्रमाण 63 टक्के आहे. नंदूरबार जिल्ह्यातील 39,615 दावे निकाली काढण्यात आले, त्यापैकी 8684 दावे मान्य झाले, याचे प्रमाण 20 टक्के आहे. उर्वरित 80 टक्के आदिवासींनी काय करावयाचे हा महत्वाचा प्रश्न आहे. या दाव्याची फेरतपासणी त्वरेने करुन आदिवासी शेतकऱ्यांना न्याय देण्याची शासनाची भूमिका आहे काय आणि त्यांना किती कालावधीत न्याय दिला जाणार आहे, हे मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी महत्वाच्या विषयाला हात घातलेला आहे. महाराष्ट्र राज्यात वनहक्क जमीन हा केंद्र सरकारचा कायदा लागू आहे. हा कायदा झाल्यानंतर दिनांक 13.12.2005 पर्यंत ज्यांचे अतिक्रमण आहे अशा आदिवासींनी व बिगर आदिवासींनी सबळ पुरावे दाखल करुन अपील दाखल करावयाचे आहे. प्रथम ग्रामसभेकडे, त्यानंतर एसडीओ यांच्याकडे अपील दाखल करावयाचे आहे, त्यांनीही अपील फेटाळल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील सादर केले पाहिजे. अशा प्रकारे त्रिस्तरीय योजना तयार केलेली आहे. या प्रमाणे राज्यात एकूण 3 लाख 38 हजार 519 दावे आले आहेत. ग्रामसभेने अमान्य केलेले दावे 50,297 आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ..

अपील होऊन उप विभागीय समितीकडे 2,89,433 दावे प्राप्त झालेले आहेत. उप विभागीय समितीने अमान्य केलेले दावे 1,67,243 आहेत. ज्यामध्ये अपील करावे लागते असे जिल्हा समितीकडे 1,18,088 दावे प्राप्त झालेले आहेत. जिल्हा समितीने अमान्य केलेले दावे 8796 आहेत. जिल्हा समितीने मान्य केलेले दावे 1,08,820 आहेत. या संपूर्ण प्रकरणामध्ये सरकारी पातळीवरील काम संपलेले आहे. परंतु या संदर्भात पुन्हा विविध समित्यांनी मागणी केलेली आहे. आदिवासींच्या संदर्भात पुन्हा पत्रक काढण्यात आले आहे. आदिवासी हे अडाणी असल्यामुळे त्यांना तेथे पर्यन्त जाता आले नाही त्यामुळे त्यांचे अपील फेटाळले, त्यांना न्याय मिळालेला नाही, पुन्हा अपील करायचे असतील तर आदिवासींना पैसे द्यावे लागतात म्हणून या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय आदिवासी विकास मंत्री, आम्ही सर्व एकत्र बसून चर्चा केली आणि असा निर्णय घेतलेला आहे की, हे काम जरी संपलेले असले तरी सुध्दा ज्यांचे दावे फेटाळलेले आहेत त्यांनी सुमोटो सेतू मार्फत अर्ज करावयाचा. परंतु आता ते अर्ज आम्हीच दाखल करुन एसडीओकडे देणार आहोत. तसेच एसडीओकडे द्यावयाच्या पुराव्याच्या बाबतीत कामगार तलाठी आदिवासींच्या घरोघरी जाऊन त्याचे अपील कशामुळे फेटाळले आहे हे त्यांना समजावून सांगत आहेत आणि तुझ्याकडे काही असेल तर ते तू दे असे सांगून ते पुरावे घेऊन दाखल करण्याचे काम चालले आहे. प्रत्येक केस पाहिली जाणार आहे. जीपीएस पध्दतीने मोजणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

काही ठिकाणी 2 हेक्टरमध्ये 20 लोकांनी मागणी केलेली आहे. या अडचणी परत विचारात घेऊन आदिवासींना न्याय मिळण्याच्या दृष्टीने जो कायदा झालेला आहे त्यानुषंगाने आदेश दिलेले आहेत. हे काम 6 महिन्यामध्ये संपविण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता काही आदिवासींना जमीन मिळत आहे हे पाहिल्यानंतर काही संघटना पुढे आलेल्या आहेत, वन जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे, यावल वगैरे भागात बाहेरच्या राज्यातूनही लोक आलेले आहेत. त्या ठिकाणी एसआरपी पाठवावे लागलेले आहेत. अशा प्रकारे बाहेरच्या लोकांनी केलेले अतिक्रमण अमान्य केलेले आहे. दिनांक 13.12.2005नंतर झालेले अतिक्रमण मान्य केले जाणार नाही. आदिवासींना योग्य हक्क दिल्या शिवाय आम्ही मागे राहाणार नाही. यासाठी लागणारी सर्व यंत्रणा शासनाने स्वत: उभी केलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. अरुण गुजराथी : मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिले. परंतु स्पेसिफिक उत्तर दिले नाही. 6 महिन्याच्या कालावधीत हे दावे पूर्ण करुन आदिवासींना न्याय देणार असे मंत्री महोदयांनी सांगितले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सेतूमध्ये आदिवासींना पुनश्च अर्ज करण्याची गरज नाही. मग हे दावे तुम्ही आपोआप स्वीकारणार आहात काय, जमिनीच्या संदर्भात या ठिकाणी, या तारखेला अपील आहे, अशी माहिती शासन आदिवासींना देईल काय, तसेच माननीय मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या बैठकीत अमान्य केलेल्या प्रकरणाबाबत झालेल्या चर्चेचा तपशील काय आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : हे दावे सू मोटो दाखल करुन घेण्यात येतील हे मी आधीच सांगितलेले आहे. या कामास वेळ लागेल. 1 लाख 67 हजार दावे आहेत. तलाठ्याने प्रत्येक गावामध्ये जाऊन आदिवासींच्या सह्या किंवा त्यांचे अंगठे घ्यावयाचे आहेत. त्यावेळी कमिटीच्या सदस्यांना देखील हजर राहाण्यास सांगितलेले आहे. हे काम सुरु झालेले आहे. दावे दाखल करुन घेण्यासाठी पैसे लागणार नाहीत. वैयक्तिक दावे करण्यात येणार आहेत. एका दिवसात जास्तीत जास्त 6 किंवा 7 दावे निकाली लागू शकतील. म्हणून हा विषय आम्ही अतिरिक्त जिल्हाधिका-यांकडे दिलेला आहे. शासनाच्या वतीने त्यांना आणखीन स्टाफ देण्यात येत असून या प्रकरणांचा लवकरात लवकर निपटारा करण्याचे काम सुरु झालेले आहे.

श्री. अरुण गुजराथी : धुळे जिल्हयामध्ये 63 टक्के आणि नंदूरबार जिल्ह्यामध्ये 20 टक्के दावे मान्य केलेले आहेत...

श्री. बबनराव पाचपुते : संपूर्ण राज्यातून ज्या केसेस आलेल्या आहेत त्यांचा निपटारा 93/94 टक्के झालेला आहे. परंतु प्रत्यक्षात आपण 32 टक्क्यापर्यन्त पोहोचलो आहोत.

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

सभापती महोदय, एकूण दाव्याचा हिशोब 32 टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. आदिवासींना न्याय देण्यासाठी केंद्र सरकारने हा कायदा केलेला आहे. तो कायदा पूर्णपणे अंमलात आणावयाचा आणि आदिवासींना न्याय मिळवून देण्याच्यादृष्टीने जे काही करावयाचे आहे, ते करण्यासाठी शासनाकडून सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनांची अंमलबजावणी पूर्ण करण्यात येणार आहे.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. परंतु या विषयाच्या बाबतीत स्थानिक पातळीवर थोडे वेगळे अनुभव येतात. पात्र आदिवासींना याबाबतीत चांगल्या पध्दतीची वागणूक मिळत नाही. अधिकारी आदिवासींना अडचणीत आणतात व कोणत्याही प्रकारचा निर्णय घेत नाहीत. अनेक प्रकरणे अमान्य आहेत. अमान्य प्रकरणाच्या संदर्भामध्ये जास्तीत जास्त आदिवासी लोकांना न्याय दिला जाईल असे शासनाकडून सांगण्यात आले असले तरी पात्र आदिवासींना खरोखरच न्याय दिला जाईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, "होय". परंतु होय एवढे उत्तर न देता यासंदर्भात मी काही माहिती सभागृहाला देऊ इच्छितो. ज्यांचे दावे फेटाळले गेले आहेत, त्यांनी स्वत:हून दावे केले पाहिजेत. परंतु त्यांच्याकडून दावे करण्यात येत नाहीत, म्हणून शासनाच्या वतीने ते दावे दाखल करुन घेणार आहोत. अपील करण्याचा अधिकार संपलेला आहे. यासंदर्भात नव्याने रिव्हू घेण्यात येणार आहे. शासन स्वत:हून दावे दाखल करुन घेणार असल्यामुळे आदिवासींना काही करण्याची गरज नाही. तलाठी आणि त्या ठिकाणी कार्यरत असलेले कर्मचारी घरोघरी जाऊन दावे दाखल करुन घेत आहेत. 20 हजारापेक्षा जास्त लोकांनी अपील केलेले आहे. आदिवासींना शिकविण्याचे काम, त्यांना प्रबोधन करण्याचे काम करण्यासाठी दोन कार्यशाळा सुरु केलेल्या आहेत. आदिवासींना काय केल्यानंतर काय मिळणार आहे, त्यांनी काय करु नये, त्यांना कशा पध्दतीने फायदा होणार आहे या संदर्भात सुध्दा माहिती देण्याचे काम करण्यात येत आहे. आदिवासींना न्याय देण्यामध्ये शासन कोठेही कमी पडणार नाही. काही गोष्टींच्या बाबतीत शासनाकडून चूका झालेल्या आहेत. त्यामुळे आदिवासींवर अन्याय झालेला आहे. आदिवासींना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

माहिती नसल्यामुळे त्यांना या गोष्टींचा फायदा देता आलेला नाही. परंतु आता प्रत्येक केसला स्वतंत्र अस्तित्व देऊन, प्रत्येक केस पाहणार आहोत. आदिवासींना लवकरात लवकर म्हणजे सहा महिन्यांच्या आत निश्चितपणे न्याय देवू.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पदवीस्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण या सारख्या वैकल्पीय विषयास अनुदान देताना होत असलेला विलंब.

मु. शी. : पदवीस्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण या सारख्या वैकल्पीय विषयास अनुदान देताना होत असलेला विलंब यासंबंधी सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, विक्रम काळे, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, संजय केळकर,नागो गाणार, डॉ.रणजित पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" पदवीस्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि शारीरिक शिक्षण या सारख्या वैकल्पीय विषयास अनुदान देताना होत असलेला विलंब, सदर बाब अनेकदा विधिमंडळात विविध संसदीय आयुधांमार्फत उपस्थित करुनही अनुदान देण्यास होत असलेली टाळाटाळ, परिणामी शैक्षणिक संस्थांवर येणारा आर्थिक ताण, मा. उच्च न्यायालयाने या बाबत याचिका क्रमांक 3510/2010, दिनांक 18 जानेवारी, 2011 वर दिलेल्या निर्णयानुसार शासनाने 15 दिवसात या बाबत निर्णय घ्यावा असा आदेश असताना सुध्दा अद्यापपर्यंत या बाबत कोणतीही कारवाई झालेली नसल्यामुळे शिक्षकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम, शासनाविषयी पसरलेला तीव्र असंतोष व या बाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. "

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी आज जी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे, हा लक्षेवधी सूचनेचा विषय तीन वेळा तारांकित प्रश्न व तीन वेळा लक्षेवधी सूचना या माध्यमातून एकूण सहा वेळा या सभागृहात चर्चेला आलेला आहे. या संदर्भात मा.न्यायालयाने निर्णय दिलेले असताना सुध्दा शासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. शासनाच्या दिनांक 24 सप्टेंबर, 1991 परिपत्रकाप्रमाणे विज्ञान शाखेअंतर्गत संगणकशास्त्र विषय सुरु केला आहे, त्यांना अनुदान दिलेले आहे. शासनाने काही विद्यालयांना अनुदान देताना भेदभावाची वागणूक दिलेली आहे. या संदर्भात मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत व त्याबाबतची माहिती लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन वितरित केले आहे, त्यात शासनाकडून जे उत्तर दिले आहे, तसेच उत्तर मागील दोन लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात दिलेले आहे. फक्त दोन, चार शब्दांचा शासनाने फेरफार केलेला आहे. या संदर्भात मा.न्यायालयाने दिलेले आदेश शासनाकडून पाळले जात नाहीत. शासनाने संबंधितांना समज देखील दिलेली आहे. तरी त्यांनी कोर्टाचा आदेश ऐकला नाही आणि सचिवांना 50 हजार रुपयांचा दंड करण्यात आला. त्यानंतर त्यांनी तीन वेगवेगळे ॲफिडेव्हीट करुन दिले आहेत. तरी देखील अधिकारी ऐकत नाहीत. त्या बाबतीत शासन काही उपाययोजना करीत नाही त्यामुळे आमच्यावर फार मोठा अन्याय होत आहे. या बाबतीत मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.3510/2010 मध्ये दिनांक 18.1.2011 रोजी दिलेल्या निर्णयानुसार शासनाने एक महिन्यात या बाबत निर्णय घेण्याचे निर्देश दिलेले आहेत असे निवेदनात नमूद केलेले आहेत. खरे तर या बाबतीत शासनाने 15 दिवसात निर्णय घ्यावा असे आदेश दिले आहेत. परंतु मला असे वाटते की,

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाकडून दिशाभूल केली जात आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णय मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले आहे की, "...decision should be communicate to the Petitioners within a period of fifteen days thereafter." म्हणजे याठिकाणी चुकीची माहिती दिली गेली आहे. दिशाभूल केली आहे. कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे येणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे हा विषय नेऊन या प्रश्नाबाबत निर्णय घेतला जाईल काय?

श्री.डी.पी.सावंत : माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जरुर या प्रकरणामध्ये दिरंगाई झालेली आहे. या प्रश्नासंदर्भात आम्ही कॅबिनेटपुढे टिप्पणी सादर केली आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हे सत्र संपण्यापूर्वी मंत्रिमंडळापुढे जाऊन या प्रश्नासंबंधी निर्णय घेऊ.

श्री एस. क्यु. जमा : सभापति महोदय, यहां पर माननीय सदस्य ने कहा कि इस विषय पर इससे पहले भी सभागृह में दो बार चर्चा हो चुकी है. हमारा कहना है कि जो उत्तर माननीय मंत्री महोदय ने आज दिया है, वही उत्तर उस समय के माननीय उच्च शिक्षा मंत्री श्री दिलीप वळसे पाटील साहब ने भी दिया था कि इस विषय को जल्द से जल्द केबिनेट मीटिंग में रखेंगे. मैं यहां पर कहना चाहता हूं कि आपने सन् 1988-89 को कट ऑफ डेट माना है कि इसके बाद कम्पयूटर साइंस या इलेक्ट्रानिक्स से संबंधित अभ्यासक्रमों के लिए आप अनुदान नहीं देंगे. हमारा कहना है कि आपने कुछ कालेजों के साथ भेद-भाव किया है. नागापुर में हिसलॉप कालेज अल्पसंख्यकों का कालेज है. वहां पर कट ऑफ डेट से पहले परमीशन देने के बाद भी आपने उनको कम्पयूटर साइंस तथा टेक्नॉलाजी से संबंधित अभ्यासक्रमों के लिए ग्रांट नहीं दी है. उस बारे में जांच करके आप कोई उचित निर्णय जल्द से लेंगे या नहीं ?

मेरा एक प्रश्न यह भी है कि आप हाई कोर्ट के आदेश का पालन करेंगे या नहीं करेंगे. क्योंकि माननीय हाई कोर्ट ने दिनांक 18 जनवरी, 2011 को आदेश दिया था कि 15 दिन के अंदर इस बारे में निर्णय लिया जाये. लेकिन इतना अधिक समय बीत जाने के बाद भी आपने उस बारे में आज तक निर्णय नहीं लिया है. हमारा कहना है कि यह बजट अधिवेशन खत्म होने से पहले आप हाई कोर्ट के आदेश का पालन करेंगे या नहीं करेंगे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कट ऑफ डेट नंतर डिस्क्रिमिनेशन झाले हे सत्य आहे. काही महाविद्यालयांना संगणक शास्त्र विषयास मान्यता दिली हे सत्य आहे. विभागाचे म्हणणे आहे की, कॉम्प्युटर सायन्स हा विषय अनुदानावर आला पाहिजे. म्हणून सर्व महाविद्यालयांचे प्रस्ताव कॅबिनेटपुढे ठेवण्यात येत आहेत. विभाग याबाबत पॉझिटिव्ह आहे.

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, हा विषय अनेक माध्यमातून सभागृहात उपस्थित झालेला होता. प्रत्येक वेळी तेच तेच उत्तर दिले गेले आहे. अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर विसंगती निर्माण केली. काही महाविद्यालयांना वंचित ठेवले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, कॅबिनेटपुढे टिप्पणी सादर केली आहे. किती महाविद्यालयांबाबत विसंगती निर्माण झाली आहे? ज्या अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर चुकीची माहिती दिली आणि इतर महाविद्यालयांवर अन्याय केला त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येईल?

श्री.डी.पी.सावंत : हा विषय तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

नंतर यू.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शासनाने डिसेंबर, 2001 मध्ये कायम विना अनुदानित तत्वावर शाळांना मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता. त्या पूर्वी अनुदानित महाविद्यालयांमध्ये शासनाच्याच अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे कायम विना अनुदानित तत्वावर केवळ संगणक शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि शारीरिक शिक्षण असे वैकल्पिक विषय विना अनुदान तत्वावर दिले आहेत. ही चूक आम्ही लक्षात आणून दिली होती व त्यानुसार दुरुस्ती सुध्दा केली व तसे कबूलही केले. काही महाविद्यालयांना मात्र खास बाब म्हणून कायम विना अनुदान ही अट बदलून विना अनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली आहे. अशा प्रकारे 20 वर्षे झाली तरी आपण या महाविद्यालयांना न्याय देत नाहीत. एकाच महाविद्यालयात एक जेवतो आणि दुसरा तोंडाकडे बघतो असा प्रकार चालू आहे. हा अन्याय शासन कधी दूर करणार आहे ? त्यानंतर 18 जानेवारी, 2001 मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात सुध्दा 15 दिवसांचा कालावधी घालून दिला असताना शासनाने या उत्तरात मात्र 30 दिवसांचा कालावधी असा उल्लेख केला आहे. तसेच केवळ संगणक शाखाच नव्हे तर शारीरिक शिक्षण आणि इलेक्ट्रॉनिक्स अशा तिन्ही विषयांना अनुदान देण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेऊन तसा निर्णय हे अधिवेशन संपेपर्यंत शासन घेणार काय ?

श्री. डी.पी.सावंत : महोदय, या तिन्ही विषयासंबंधीचा प्रस्ताव आम्ही मंत्री मंडळासमोर घेऊन जात आहोत व हे सत्र संपेपर्यंत यासंबंधीचा निर्णय होईल अशी अपेक्षा आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: एम्प्रेस मिल (नागपूर) बंद झाल्याने कामगारांच्या निर्माण झालेल्या विविध समस्या

मु.शी.: एम्प्रेस मिल (नागपूर) बंद झाल्याने कामगारांच्या निर्माण झालेल्या विविध समस्या यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, नागो गाणार वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कुपोषित बालकांना सुदृढ करण्यासाठी निर्माण केलेली बालविकास केंद्रे

मु.शी.: कुपोषित बालकांना सुदृढ करण्यासाठी निर्माण केलेली बालविकास केंद्रे यासंबंधी श्रीमती अलका देसाई, सर्वश्री राजन तेली, मनिष जैन, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"अंमळनेर (जि.जळगाव) येथे कुपोषित बालकांना सुदृढ करण्यासाठी बालविकास केंद्राची स्थापना करण्यात येणे, परंतु याच बालविकास केंद्रात जवळपास 15 बालके कुपोषित असल्याची धक्कादायक माहिती नुकतीच आढळून येणे, बालविकास केंद्रातच अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने कुपोषित क्षेत्रात निर्माण होत असलेले चिंतेचे वातावरण, सबब आदिवासी भागात व कुपोषित क्षेत्रात दिवसेंदिवस वाढणाऱ्या कुपोषणाला आळा घालण्यासाठी उभारण्यात आलेल्या बालविकास केंद्रात कुपोषणावर मात करण्यासाठी लागणाऱ्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याची, वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी यांची पदे वाढविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : महोदय, शासनाने कुपोषितांना सुदृढ करण्यासाठी केंद्र उभारण्याचा निर्णय घेतल्याचे निवेदनात म्हटले आहे. हा निर्णय घेण्यासाठी शासनाला इतका उशीर का झाला ? राज्यातील कुपोषणाचे चित्र पाहिले तर शासन आदिवासी मुले व त्यांच्या मातांवर जो खर्च करते तो त्यांच्यापर्यंत प्रत्यक्षात पोहचतो की नाही हा प्रश्न निर्माण होतो. तसेच निवेदनात असेही म्हटले की, या कुपोषितांना 8 वेळा आहार दिला जातो. या अनुषंगाने आम्ही महिला व बालकल्याण विभागाच्या सचिवांना प्रश्न विचारला होता की, कुपोषित बालकांना अन्न देण्यासाठी सेंटर्स निर्माण करण्याची वेळ सरकारवर का येते ? तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आम्ही त्यांना अन्नाची पाकिटे देतो. तेव्हा आम्हाला असा प्रश्न पडला की, अन्नाची पाकिटे हा काय प्रकार आहे ? पण त्याचे उत्तर आम्हाला मिळालेच नाही. यातून प्रश्न असा निर्माण होतो की, आदिवासी बालकांवर तसेच कुपोषितांवर एवढा खर्च करतो तर कुपोषणाचे प्रमाण वाढण्याचे कारण काय आहे ? तसेच त्या बालकांच्या आयांना सकाळपासून सायंकाळी 5 वाजेपर्यंत थांबावे लागते, मग मुलांचे काय याचे उत्तर मात्र निवेदनात दिसत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

कुपोषित बालकांसाठी चालविण्यात येणा-या केंद्राची संख्या किती आहे, ही केंद्रे केव्हापासून सुरु करण्यात आलेली आहेत, एकूण कुपोषित बालकांपैकी किती बालके बरी होऊन आपल्या घरी गेलेली आहेत, कुपोषित बालके सुदृढ होण्यासाठी आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत, कपोषित बालकांच्या मातांना अन्न दिले जाणार आहे काय ? सभापती महोदय, आदिवासींच्या प्रश्नासंदर्भात सभागृहात नेहमी चर्चा होत असते परंतु आदिवासींना त्याचा काहीही लाभ मिळत नाही हा माझा दावा आहे. ज्या कुपोषित बालकांना सुदृढ करण्यात आले आहे अशा बालकांना लोकांसमोर आणले जाणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला तर मला उत्तर देण्यास सोपे जाईल परंतु तरी सुध्दा मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, मूळ प्रश्न हा अमळनेर तालुक्याच्या संदर्भातील आहे. बालविकास केंद्राच्या संदर्भातील थोडक्यात माहिती मी देणार आहे. एका गावात जर 10 पेक्षा जास्त कुपोषित बालके आढळली तर एक बालविकास केंद्र सुरु केले जाते व त्याप्रमाणे अमळनेर तालुक्यात एक बालविकास केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. ग्रामविकास केंद्रामध्ये 30 दिवस कुपोषित बालकांना ठेवले जाते या बालकांना 8 दिवसाचा आहार दिला जातो व कुपोषणाला आळा घालण्यासाठी तसेच आहार कसा द्यावयाचा, स्वच्छता कशी ठेवावयाची यासंदर्भात पालकांना प्रशिक्षण दिले जाते. तसेच या कुपोषित बालकांना सप्लीमेंटरी मेडीसीन दिली जातात. त्याच बरोबर या बालविकास केंद्रामध्ये रोज 8 ते 9 या वेळेत मुलांचे वजन केले जाते. बालविकास केंद्रात उपचार करुनही जर बालक सुधारले नाही तर अशा बालकांना पीएचसी केंद्रातील सीडीसी मध्ये 21 दिवस ठेवले जाते. या ठिकाणीही जर बालकांची परिस्थिती सुधारली नाही तर या बालकांना रुरल हॉस्पिटल, सब डिस्ट्रीक्ट हॉस्पिटल, डिस्ट्रीक्ट हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, सुपर स्पेशालीटी हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी पाठविले जाते. अमळनेरमध्ये 152 गावात 3 टप्प्यात बालविकास केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. 30 दिवसाच्या उपचारानंतर 272 बालकांपैकी 240 बालकाची शारीरिक स्थिती सुधारली असून त्यांचे वजन वाढल्यामुळे या बालकांना त्यांच्या घरी पाठविण्यात आलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माहितीमध्ये अमळनेर तालुक्यातील 15 बालकांच्या संदर्भात काहीच माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अमळनेर येथील 15 बालकांच्या संदर्भातील सविस्तर माहिती मंत्री महोदया देतील काय ? तसेच उत्तरामध्ये म्हटले आहे की, "तिस-या टप्प्यात 82 बालकांना दाखल करण्यात आलेले आहे". त्यामुळे 82 बालकांपैकी आजचा बॅलन्स किती आहे याची माहिती माननीय मंत्री महोदया देतील काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, अमळनेर तालुक्यातील 15 बालकांचा विषय समजत नाही, त्याचे कारण असे आहे की, ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदया जे काही उत्तर देत आहेत ते आक्षेपार्ह आहे. श्रीमती अलका देसाई यांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात विस्ताराने प्रश्न विचारले होते परंतु सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैन यांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात स्पेसिफिक माहिती देण्यात यावी असा प्रश्न विचारलेला आहे. परंतु मंत्री महोदया म्हणतात की, मला या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील माहिती कळाली नाही, विषय कळाला नाही. त्यामुळे मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेचा होमवर्क चांगल्या प्रकारे करुन यावा किंवा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा विषय मला संपूर्ण समजलेला आहे फक्त त्यांचा स्पेसिफिक प्रश्न काय आहे तेच मला समजले नाही.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

उप सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर शांतपणे ऐकून घ्यावे. त्यांच्या उत्तरामुळे जर सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही तर त्यांनी नंतर उप प्रश्न विचारावेत

प्रा.फौजिया खान :सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये 15 बालकांचा उल्लेख करण्यात आलेला नाही हे स्पष्ट आहे. जी कुपोषित बालके आहेत वा कमी वजनाची बालके आहेत त्यांना ग्राम विकास केन्द्रामध्ये दाखल करण्यात येत असते अशा बालकांची संख्या सुध्दा मी वाचून दाखवलेली आहे.तीन टप्यामध्ये अशा प्रकारच्या बालकांना ग्राम विकास केन्द्रामध्ये दाखल करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यामध्ये 8 ग्राम विकास केंद्रामध्ये 109 बालकांना दाखल करण्यात आले होते त्यातील 91 बालकांमध्ये सुधारणा झाल्यामुळे त्यांना घरी पाठविण्यात आले होते. दुस-या टप्प्यामध्ये 81 बालकांना दाखल करण्यात आले होते त्यातील 71 बालकांचे वजन वाढल्यामुळे त्यांना घरी पाठविण्यात आले होते.. त्याचप्रमाणे तिसऱ्या टप्प्यामध्ये 6 ग्राम विकास केंद्रामध्ये 82 बालकांना दाखल करण्यात आले होते त्यापैकी 78 बालकांचे वजन वाढल्यामुळे त्यांना घरी पाठविण्यात आले होते. या पूर्वी मी सांगितल्याप्रमाणे 32 मुलांमध्ये जेनेटिक डिसऑर्डर वा मेडिकल प्रॉब्लेम असल्यामुळे त्यानां बाल विकास केंद्रामध्ये पाठविण्यात आले होते. त्यातील काही मुलांना घरे पाठविण्यात आले होते आणि सात दिवसामध्ये अंगणवाडी कार्यकर्ती घरी जाऊन त्यांचा फॉलोअप करीत असतात 26 आठवडयापर्यंत हा फॉलोअप करण्यात येत असतो.

श्री.अलका देसाई : माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, कुपोषित बालकांची संख्या वाढण्याची कारणे काय आहेत ? या बालकांना अन्न देत नाही त्यामुळे ही बालके कुपोषित होतात काय ? 200 बालकांना बाल विकास केंद्रामध्ये दाखल करण्यात आले असे निवेदनात म्हटलेले आहे, तेव्हा ज्या अर्थी 200 बालकांना दाखल करण्यात येते त्या अर्थी आपले कोठे तरी चुकत आहे असे शासनाला वाटत नाही काय ,जर वाटत असेल तर त्यामध्ये कधी सुधारणा करण्यात येणार आहे ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांना मला असे सांगावयाचे आहे की, कुपोषणाची कारणे वेगवेगळी असू शकतात केवळ आहार वा गरिबीशी कुपोषणाचा प्रश्न निगडीत नाही. कुपोषण ही एक सामाजिक समस्या आहे. मुलींची लग्न लवकर होणे, कमी वजनाची मुले जन्माला येणे, माताकडे पुरेसे दूध नसणे, स्वच्छता नसणे इत्यादी कुपोषणाची वेगवेगळी कारणे आहेत, कुपोषण होऊ नये यासाठी समाजामध्ये प्रसार करणे गरजेचे आहे. कुपोषण फक्त भारतामध्ये वा आपल्या राज्यातच आहे असे नव्हे तर संपूर्ण जगातच कुपोषण आहे.जास्त खाल्यामुळे वा कमी खाल्यामुळे सुध्दा कुपोषण होत असते. कुपोषणाचे प्रकार देखील वेगवेगळे आहेत. 200 मुलांना कुपोषणामुळे बाल विकास केंद्रामध्ये दाखल करुन घेण्यात आलेले आहे.

उप सभापती : या नंतर सभागृहाच्या परवानगीने वि.स.वि.क्रमांक 89 चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LXXXIX OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्या प्रमाणे,मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 89 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 89 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस व सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

(सदस्य अनुपस्थित)

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 13 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 89 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 89 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXX OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 30 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 30 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस व सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सदस्य अनुपस्थित)

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 30 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 30 संमत झाले आहे.

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने औचित्याच्या मुद्याव्दारे एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे की, आज आझाद मैदानावर दोन वेगवेगळया संघटनांचे मोर्चे आले आहेत. त्यामध्ये शिक्षक, संस्था चालक आणि पालकांचा मोर्चा आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, जो नवीन कायदा करण्यात येणार आहे त्यामुळे 1987 चा कॅपिटेशन फी बंदीबाबतचा कायदा रद्दबातल ठरणार आहे. या शिवाय त्यांच्या आणखीन मागण्या आहेत. या बाबतीत मंत्री महोदयांनी दखल घेऊन त्यांच्या प्रतिनिधींना बोलावून घ्यावे आणि त्यांचे म्हणणे समजावून घेऊन त्यामधून काही तरी तोडगा काढून हा प्रश्न सोडवावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, महाराष्ट्रामध्ये बऱ्याच वर्षापासून सातत्याने बी.ई.एम.एस. च्या डॉक्टर्सचा प्रश्न चर्चिला जात आहे. आयुर्वेदीक डॉक्टर्सप्रमाणे बी.इ.एम.एस. झालेल्या डॉक्टर्सना सरकारी सेवेमध्ये घेतले जात नाही. तसे पाहिले तर आयुर्वेदीक डॉक्टर आणि बी.इ.एम.एस. डॉक्टर्समध्ये फार फरक नाही. त्यांना सर्व प्रकारच्या सुविधा दिल्या जातात, तशाच प्रकारचे शिक्षणही दिले जाते. परंतु या वर्गाला समाजापासून बाजूला ठेवले गेले आहे, हे अतिशय चुकीचे आहे. या करिता संबंधित माननीय शिक्षण मंत्र्यांनी आणि माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी त्यांचे नेमके काय म्हणणे आहे हे समजावून घ्यावे आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. सभापती महोदय, मी आपणामार्फत या दोन संघटनांचे प्रश्न सभागृहापुढे मांडले असून आपण त्या संदर्भात शासनाला आदेश द्यावेत अशी विनंती करतो.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी सभागृहात जे प्रश्न मांडले आहेत, त्याची संबंधित मंत्री महोदयांनी दखल घ्यावी आणि योग्य ती उपाय योजना करावी.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: मौजे डोणगांव, (ता.जि.बीड) येथील ज्योतिराम घुले नावाच्या धनुर्विद्या खेळाडूस एशियाड स्पर्धेसाठी मदत देणेबाबत

मु.शी.: मौज डोणगांव, (ता.जि.बीड) येथील ज्योतिराम घुले नावाच्या धनुर्विद्या खेळाडूस एशियाड स्पर्धेसाठी मदत देणेबाबत ॲड.उषाताई दराडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड उषाताई दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"मौजे डोणगाव (ता.केज, जि.बीड) येथील ज्योतिराम घुले नावाच्या धनुर्विद्या निपुण असलेल्या खेळाडूने दिनांक 24 ते 26 डिसेंबर 2010 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय धनुर्विद्येत सुवर्ण पदक संपादन करण्यात येणे, तथापि एशियाड स्पर्धेसाठी निवड होऊनही आर्थिक परिस्थितीमुळे सदर खेळाडूस माघार घ्यावी लागणे, त्यामुळे त्याच्या मनावर झालेला विपरीत परिणाम तसेच खेळाडूच्या गुणाला वाव देणेबाबत शासनाने मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. धन्यवाद.

. . . .वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील मुलींच्या सुरक्षेबाबत

मु.शी.: समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील मुलींच्या सुरक्षेबाबत श्री.सुभाष चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात समाजकल्याणाची 271 वसतिगृहे असून त्यापैकी मुलींची जवळपास 150 वसतिगृहे आहेत. या वसतिगृहात शिक्षणासाठी पालक आपल्या मुलींना दूरवरुन वसतिगृहात सुरक्षित राहू शकतील या विश्वासाने पाठवितात. परंतु सुरक्षेच्या अंगाने या वसतिगृहाकरीता "ना नियम आहेत ना मार्गदर्शक तत्वे," या वसतिगृहात सुरक्षेच्या दृष्टीने रामभरोसेच कारभार आहे. मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या महिला गृहपाल नेहमीच गैरहजर असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे रखवालदार सुध्दा वेळेवर उपस्थित रहात नसल्याचे वेळोवेळी आढळून आले आहे. मुलींच्या सुरक्षेविषयी योग्य ती दखल न घेणे ही अतिशय चिंताजनक बाब समोर आलेली आहे. यामुळे वसतिगृहातील मुलींच्या पालकांच्या विश्वासाला तडा जात असल्याने त्यांच्यात निर्माण होत असलेले चिंतेचे व संतापाचे वातावरण, या अतिशय महत्वाच्या व गंभीर विषयावर चर्चा होण्यासाठी मी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

. . . .वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावर्डे-कणकवली येथे दिनांक 17-03-2011 रोजी झालेल्या वेगवेगळया अपघातात दोघांचा मृत्यू होणे तसेच काहीजण जखमी होणे

मु.शी.: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावर्डे-कणकवली येथे दिनांक दि.17-03-2011 रोजी झालेल्या वेगवेगळया अपघातात दोघांचा मृत्यू होणे तसेच काहीजण जखमी होणे याबाबत श्रीमती अलका देसाई वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"सावर्डे-कणकवली (जि.सिंधुदुर्ग) येथे दिनांक 17-03-2011 रोजी वा त्यादरम्यान वेगवेगळया ठिकाणी झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू होऊन पाच प्रवासी गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना घडल्याचे आढळून येणे, सध्या राज्यात रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, वाहनचालक नियमांचे पालन करीत नसणे, कित्येकदा वाहनचालक मद्य पिऊन वाहन चालवित असणे, मर्यादेपेक्षा वाहनांचा वेग वाढविणे तर कधी इतर वाहनांना ओव्हर टेक करतात, यामुळेच वाहनांचे अपघात होऊन प्रवाशांचा नाहक बळी जात असणे, यामुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊनच प्रवास करावा लागणे, यामुळे प्रवाशांमध्ये प्रवास करताना भीतीचे व चिंतेचे वातावरण सतत असणे, सबब, शासनाचे नियम धाब्यावर बसवून त्याचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर कठोर कारवाई करण्याची व वाहन चालकांची तपासणी करण्याची, त्याचप्रमाणे अपघातात मृत्यू पावणाऱ्या प्रवाशांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे. अशा या अतिशय महत्वाच्या व गंभीर विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावी. याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

. . . .वाय-4

पृ.शी.: गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पात बुडून मृत्यू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होण्याचे वाढत चाललेले प्रमाण

मु.शी.: गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पात बुडून मृत्यू होण्याचे वाढत चाललेले प्रमाण याबाबत श्री.एस.क्यु.ज़मा यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यु.ज़मा यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.एस.क्यु.ज़मा (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"गोसीखूर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पात बुडून मरण पावलेल्या तीन व्यक्तींच्या वारसांना नुकतीच शासनाने प्रत्येक 1 लक्ष रुपयांची मदत वितरीत केली आहे. मदत वितरण समारंभ सुरु असतानाच दि.27-03-2011 ला पुन्हा हरिश्चंद्र संपत शिवरकर नावाचा तरुण बुडून मृत्यू पावल्याचे प्रकरण उघडकीस आले, केंद्र शासनाचे थेट अर्थसहाय्य मिळविण्यासाठी प्रकल्पात पुरेसा पाणी साठा करण्यात येणे, परंतु पाणी साठा वाढविल्यामुळे बाधित होणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील 3 व नागपूर जिल्ह्यातील 13 गावांचे पुनर्वसन न करणे, फक्त केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याच्या अटी पूर्ण करण्यासाठी पाणीसाठा वाढविताना बाधित होणाऱ्या 16 गावांचा कोणताही विचार करण्यात आला नाही व त्यामुळे दैनंदिन गरजा पूर्ण करताना वारंवार अपघाताने बुडून मृत्यू होण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. 16 गावांचे पुनर्वसन न करता वाढविण्यात आलेला पाणी साठा त्वरित कमी करावा अशी होत असलेली मागणी व अकस्मात मृत्यूचे वाढते प्रकार याबाबत गोसीखूर्द प्रकल्प परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली चीड व चिंतेचे वातावरण याबाबत शासनाची भूमिका व शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

सभापति महोदय,मैं आपकी अनुमति से एक विशेष उल्लेख प्रस्तुत कर रहा हूं. नागपुर, विदर्भ के लिए इंदिरा सागर गोसिखुर्द प्रकल्प एक बहुत ही महत्वपूर्ण प्रोजेक्ट है. इस प्रकल्प के काम में 20-25 साल का विलम्ब हुआ है. दिनांक 20 मई, 2010 को, उस समय के माननीय मुख्यमंत्री जी के स्तर पर एक बैठक हुई. जिसमें केन्द्रीय मंत्री जो कि रामटेक लोकसभा क्षेत्र के लोकप्रतिनिधि है, वे भी उस बैठक में उपस्थित थे. उस बैठक में निर्णय लिया कि प्रकल्पग्रस्तों की

.....वाय-5.

श्री.एस.क्यु.ज़मा . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

समस्याओं का समाधान जल्द से जल्द किया जाए. इस बात पर कार्यवाही न करते हुए, जो पुनर्वसन प्राधिकरण है, उन्होंने दिनांक 10 अगस्त 2010 को बिना पुनर्वसन किए हुए, चाहे महाराष्ट्र का पुनर्वसन कानून 1999 का हो या केन्द्र शासन का सन 2007 का पुनर्वसन कानून हो, प्राधिकरण ने पुनर्वसन करने का निर्णय लिया. डॅम में 239 मीटर पानी बढ़ाने का निर्णय लिया. 237.2 मीटर तक पानी चला गया. उसके बाद वहां के प्रकल्पग्रस्तों ने 15 नवम्बर को मोर्चा निकाला. अभी 237.2 मीटर तक पानी का लेवल है. उसके कारण पहले टप्पे में नागपुर जिले के 13 गांव और भंडारा जिले के 3 गांवों में पानी घूस गया. उसका प्रभाव दूसरे और तीसरे टप्पे पर भी पड़ा. दिनांक 9 मार्च को तीन महिलाएं वहां पर डूबकर मर गई.

सभापति महोदय, मैं कल नागपुर में था. महाराष्ट्र शासन ने मुख्यमंत्री कोष से तीनों मृतकों को एक-एक लाख रुपये के चेक देने थे. मैं भी वहां पर गया. माननीय राज्यमंत्री श्री राजेन्द्र मुलक जी वहां नहीं जा पाए, उमरेड उनका क्षेत्र है. केन्द्रीय मंत्री श्री.मुकुल वासनिक जी के पिताश्री माजी खासदार श्री बालकृष्ण वासनिक जी वहां पर चेक देने के लिए गए. वहां के तहसीलदार और नायब तहसीलदार के उपस्थिति में, हम लोगों ने उनके परिवार वालों को मुख्यमंत्री सहायता कोष का चेक दिया. लेकिन कल ही वहां पर एक और चौथा व्यक्ति डूबकर मर गया. उसका नाम श्री हरीचंद संपत शिवरकर है.

सभापति महोदय, सदन के माध्यम से मेरी शासन से मांग है कि पानी का लेवल 237.2 मीटर तक जाने के कारण नवम्बर से लेकर अभी तक पानी भरा है. उस पानी के लेवल को कम किया जाए ताकि वहां पर फिर कोई दुर्घटना न हो. इस बात को ध्यान में रखते हुए, पानी का लेवल कम किया जाए. जब तक पुनर्वसन का निर्णय माननीय मुख्यमंत्री एवम् केन्द्रीय मंत्री श्री मुकुल वासनिक जी के उपस्थिति में नहीं होता है, तब तक पानी का लेवल नीचे कर के गांव वालों की जान की सुरक्षा की चिंता की जाए, ऐसी हमारी प्रशासन से मांग है.

इसके बाद कु.थोरात . . . .

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

पृ. शी. : बालकांचे लैंगिक शोषण.

मु. शी. : बालकांचे लैंगिक शोषण याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, बालकांचे लैंगिक शोषण करणाऱ्या डंकन ग्रॅंट आणि ॲलन वॉल्टर्स या ब्रिटिश नागरिकांना या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा तुरुंगवासात धाडले आहे. आपल्याकडे विशेषत: मुंबई शहरामध्ये अशा प्रकारचे लैंगिक शोषण, ते सुध्दा परदेशातून आलेल्या संस्था किंवा व्यक्ती या निमित्ताने करत असतात. आयपीसी कलम 375 मध्ये महिलांवर बलात्कार आणि कलम 354 मध्ये अनैसर्गिक लैंगिक संबंधाबाबत शिक्षांची तरतूद आहे. परंतु बालकांच्या लैंगिक शोषणा बाबत कोणतेही कलम नाही. मुंबई या देशाच्या आर्थिक राजधानीचे नाव आता लैंगिक शोषणासाठीचे, "सेक्स्युअल टुरिझम सेंटर" असा आंतरराष्ट्रीय मासिकांमधून उल्लेख होऊ लागला आहे. महाराष्ट्र शासनाने इंडियन पिनल कोडमध्ये या साठीच्या कलमांचा समावेश होण्यासाठी त्वरित पाऊले उचलावीत, यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या माध्यमातून करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई महापालिकेच्या सायन, के.ईएम. व नायर या रुग्णालयात निर्माण झालेला स्वच्छतेचा व कामगारांच्या मजुरीचा प्रश्न.

मु. शी. : मुंबई महापालिकेच्या सायन, के.ई.एम. व नायर या रुग्णालयात निर्माण झालेला स्वच्छतेचा व कामगारांच्या मजुरीचा प्रश्न याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री. किरण पावसकर यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या प्रमुख सायन, के.ई.एम. व नायर या तिन्ही रुग्णालयात स्वच्छतेच्या बाबतीत परिस्थिती अत्यंत गंभीर असून. या ठिकाणी रुग्णांना बरे करण्यापेक्षा रोगराई परसरण्याची भीती निर्माण झालेली आहे. स्वच्छतेसाठी नेमलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या मुदतवाढीची फाईल प्रशासनाच्या वेळखाऊ धोरणात अडकल्याने साफसफाईचे काम थांडावले असून तिन्ही रुग्णालयात मिळून 1050 पदे रिक्त आहेत. नियमाप्रमाणे काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला 224 रुपये मिळाले पाहिजेत. त्या ऐवजी प्रशासनाकडून 160 रुपयात कामगारांना राबवून घेतले जात आहे. एकीकडे रिक्त पदे भरली जात नाहीत तर दुसरीकडे साफसफाईसाठी लागणारे सामान त्यांना दिले जात नाही. तसेच 224 रुपयांऐवजी 160 रुपयात काम करुन घेतले जात आहे, याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत उपाययोजना करण्याची विनंती करतो.

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.09 ते 3.30 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एक बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सकाळी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विरोधी पक्षाच्या अनुपस्थितीबद्दल, त्यांच्या बहिष्काराबद्दलचा विषय उपस्थित केला होता. आपण त्यांचा सन्मान करतो आणि ती लोकशाहीची परंपरा आहे. विधानसभा सभागृहामध्ये जे काही घडले त्या बद्दल विधानसभेतील काही सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आले. त्यांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी या सभागृहातील विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आणि सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली पायऱ्यांवर बसण्याचा निर्णय घेतला. त्या बद्दल आमची हरकत नाही. त्या बाबत आमचे काही म्हणणे असण्याचे कारण नाही. त्यामध्ये मी जात नाही. परंतु आपण विधिमंडळात जेथून प्रवेश करतो तेथील पायऱ्यांवर विरोधी पक्षाचे नेते आणि सन्माननीय सदस्य बसलेले असताना त्यांनी लोकशाहीला शोभेल अशा पध्दतीने जर काही घोषणा दिल्या, निदर्शने केली तर एकवेळ आपण ते समजू शकतो. परंतु माणुसकीला, लोकशाहीला, संकेताला पायदळी तुडविण्याचे काम, मातीत घालण्याचे काम खाली बसलेले काही सन्माननीय सदस्य करीत आहेत. त्या ठिकाणी ज्या काही घोषणा दिल्या जात आहेत त्या आपल्याला ऐकाव्याशा वाटणार नाहीत अशा पध्दतीच्या आहेत. ज्याच्याकडे सर्व राज्याचे लक्ष आहे अशा या पवित्र आवारामध्ये ते होत आहे. काही घोषणा विधान परिषदेतील सन्माननीय सदस्य आणि विधानसभेतील सन्माननीय सदस्य देत आहेत. उदाहरण म्हणून सुध्दा त्यातील घोषणा ऐकणे आपल्याला बरोबर वाटणार नाही एवढ्या वाईट पध्दतीच्या घोषणा त्या ठिकाणी दिल्या जात आहेत. सरकारमधील माननीय मंत्री महोदय असतील, सत्ताधारी पक्षातील काही सदस्य असतील त्यांच्या नावाने या घोषणा दिल्या जात आहेत. या घोषणा ज्या पवित्र ठिकाणी दिल्या जात आहेत त्याचे कोणत्याही परिस्थितीमध्ये समर्थन होऊ शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

त्यामुळे या विधिमंडळाचे सभापती म्हणून आपल्यावर आणि विधानसभेच्या माननीय अध्यक्षांवर ही फार मोठी जबाबदारी आहे की, विधिमंडळाची प्रतिमा बिघडविण्याचे जे काम सन्माननीय सदस्य करीत आहेत किंवा करणे सुरु आहे त्यांना एक तर या विधिमंडळाच्या संपूर्ण परिसराच्या बाहेर घालवून काय करावयाचे असेल ते करावे परंतु या परिसराला काळिमा फासण्याचे जे काम करीत आहेत ते बंद करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा आपण त्यांच्यावर अत्यंत कडक कारवाई करुन यापूर्वी जसे अनेक वेळा या विधिमंडळाची उंची वाढविण्याचे काम केलेले आहे तसे काम आपण निश्चितपणे करावे अशी माझी आपल्याला अतिशय नम्रपणाची विनंती आहे.

उप सभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कथन केलेला प्रकार माननीय सभापती यांच्या कानावर घालण्यात येईल व त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उप सभापती : आज अर्थसंकल्पावरील चर्चा घेण्यात येणार नाही असे ठरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी दिलेल्या ज्या अर्धा-तास चर्चा आज कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या आहेत त्या पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या मंगळवार, दिनांक 29 मार्च, 2011 रोजी सकाळी 10.30 ते 12.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. त्यामध्ये सत्ताधारी पक्षाकडून देण्यात आलेल्या रोजगारासंबंधीच्या प्रलंबित प्रस्तावावर माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह चर्चा घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता भरेल.

. (सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 34 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 29 मार्च, 2011 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही